# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **CS2021**

**A**

**Total Que.: 80**


**Mob. No. 9923262977** **राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा – 2021** **Marks : 200**

**Date : 28/11/2021** **विषय : – (C-SAT) [222]** **Time : 2 hrs.**

## सूचना

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ८० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा–क्रमांक हया चौकोनांत न विसरता **काळया बॉलपेनने** लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे **श्रेयस्कर** आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

५. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

६. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**."

**प्रश्न क्रमांक 1 ते 4 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

मार्क ट्वेन एके ठिकाणी म्हणतो की मी शाळा सोडली. कारण माझ्या असे लक्षात आले की ती माझ्या शिक्षणाच्या फारच आड येते. पुढे जगदविख्यात झालेल्या या लेखकास असलेली संधी भारतीय विद्यार्थ्यांना मिळाली तर अनेक जण शाळा सोडणेच पसंत करतील. शाळेविषयी ही अशी नकोशी भावना तयार होण्यास दप्तरापासूनच सुरूवात होते. या शाळेतल्या दत्पराचे ओझे कमी होणार, या वात्रेने सर्वात अधिक आनंद होणारच असेल, तर तो लहानग्यांना, हे ओझे कीम करणे पालकांच्या हाती नव्हते आणि शाळांनाही ते शक्य नव्हते. पण अखेर केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयानेच यासंबंधीचा फतवा काढल्याने कदाचित काही परिणाम होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना दप्तराचा भार आणि पालकांच्या खिशाला शुल्काचा अशी ही आपल्याकडची स्थिती त्यामुळे पालक आणि पाल्य दोघेही शाळेवर नाराज पालकांना पाल्याच्या पाठीवरचे ओझे जाणवत नसेल, पण खिशातल्या शुल्काचा चिमटा मात्र त्यांना जाणवतो. त्यामुळे खासगी शाळांनी किती शुल्क आकारावे, याबाबत गेल्या काही वर्षात पालकांमध्ये प्रचंड प्रमाणात चर्चा सुरू होती. राज्याच्या विधिमंडळात संमत झालेल्या विधेयकामुळे आता पालकांचा आवाज अधिक बुलंद होऊ शकणार आहे. एकाच दिवशी दप्तराचे ओझे कमी करण्याचा केंद्राचा आणि शुल्क समितीच्या कक्षेत विनाअनुदानित शाळांचाही समावेश करण्याचा राज्याचा निर्णय जाहीर झाल्यामुळे एकूणच शिक्षणक्षेत्राशी संबंधित अनेक विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

तथापि यातील एका विरोधाभासाची दखल घ्यायला हवी. प्रत्येकच पालकाला आपल्या मुलाने उत्तम दर्जाचे शिक्षण घ्यावे असे वाटत असते. असे शिक्षण घेतल्यानंतर त्याच उत्तम व्यवसायासंबंधी असतील आणि त्यातच त्याच्या भविष्याचे सार्थक आहे, असे वाटणाऱ्या पालकांची संख्या सतत वाढतेच आहे. पण त्यासाठी अधिक शुल्क आकारणीस मात्र त्यांचा विरोध असतो. मुलांच्या पाठीवरच्या ओझ्यापेक्षा खिशाला बसणारी झळ त्यांना अधिक महत्वाची वाटते. अधिक सोयीसुविधा असणारी शाळा त्यांना हवी असते पण त्यासाठी अधिक पैसे मोजताना मात्र त्यांना त्रास होतो. गेल्या काही दशकांत महाराष्ट्रातील मोठया शहरांमध्ये खासगी शाळांचे अक्षरश: पेव फुटले तेथील शैक्षधिक दर्जा 'सरकारी' शाळांपेक्षा अधिक चांगला असतो, अशी चर्चा सुरू झाल्याने पालकांमध्ये उत्तम शाळा मिळण्यासाठी प्रचंड चढाओढ सुरू झाली. पालकांची गरज ओळखून शाळांनीही मग अनेक नवनवी 'पॅकेजेस' सुरू केली. शिक्षणाबरोबरच अन्य सोयीसुविधांचा पाऊस सुरू झाला. आपल्या पाल्याने सर्वगुणसंपन्न व्हावे, या इच्छेपोटी पोहण्याचा तलाव असणारी किंवा मैदान असणारी शाळा पालकांना अधिक उपयुक्त वाटू लागली. निमशहरी आणि ग्रामीण भागांत मात्र याविरूध्द चित्र दिसते. येथे खाजगी शाळा आणि सरकारी शाळा यातून निवड करण्याचा पर्यायच नसल्याने पाल्यांना उपलब्ध शाळेत शिकणे क्रमप्राप्त ठरते. तेथील अनेक सरकारी शाळा उत्तम असतात सरकारी शाळांना संपूर्ण अनुदान देऊनही त्यांचा दर्जा सुधारत नाही, ही तक्रार मुख्यत: शहरी भागांत असते. ग्रामीण शाळांकडे शिक्षण खातेही फारसे लक्ष देत नाही. त्यामुळे सरकारी अनुदान नसलेल्या अशा विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहायित शाळा यांना आपोआपच प्राधान्य मिळत गेले. शिक्षणाच्या पलीकडे जाऊन कृतीआधारित शिक्षणाची नवी व्यवस्था अशा शाळांमधून सुरू झाली अनेक उपक्रम राबवण्याच्या नादात विद्यार्थ्यांना अहोरत्र शाळेचा धाक वाढू लागला. 'प्रोजेक्टस' नावाची एक भिती त्यामुळे उभी राहिली. त्यानेही दप्तराचे वजन वाढू लागले. शहरी भागातील पालकांना आपला पाल्य शाळेतून लवकर घरी येणे खरे तर परवडणारे नसते. त्यामुळे शाळा सुटल्यानंतरही त्यांचा गळयात दोन - तीन क्लासचे वेगळे दप्तर यांमुळेही हे ओझे वाढतच गेले. त्यावर ना सरकार अंकुश ठेवू शकत ना शाळा.

1. कृती आधारीत शिक्षणाची नवी व्यवस्था याबाबत लेखकाने कोणते मत व्यक्त केले ?

अ) यामुळे उच्च दर्जाचे शिक्षण मिळेल

ब) यामुळे दप्तराचे ओझे वाढणार

क) यामुळे विद्यार्थ्यांना प्रोजेक्टसचा भार सोसावा लागणार

1) अ 2) ब 3) अ, ब, क 4) ड

---

2. लेखकाच्या मते पाल्यांच्या शिक्षणात पालकांची भूमिका कशी असावी ?

अ) आपल्या पाल्यास उत्तम दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्नशील असावे

ब) पालकांच्या आग्रहामुळे पाल्यांच्या शिक्षणात इतर सुविधांच्या नादात शाळा अडसर होवू नये

क) पाल्यांच्या शिक्षणात पालकांची आपेक्षा वाढवून त्यांच्या शिक्षणात अडथळा आणू नये

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

---

3. लेखकाच्या मते कोणत्या शाळेचा दर्जा चांगला आहे ?

अ) खाजगी शाळा ब) सरकारी शाळा क) विना अनुदानित आणि स्वयं अर्थसहायित शाळा

1) अ 2) ब 3) निश्चित सांगता येत नाही

---

4. हा उतारा लिहण्यामागचा लेखकाचा हेतू कोणता ?

अ) मुलांसाठी दप्तरांचे ओझे कमी व्हावे

ब) पालकांसाठी शिक्षण शुल्काचे ओझे कमी व्हावे

क) शासनाच्या निर्णयाने दप्तराचे ओझे कमी होईलच असे नाही तर पालकांचे प्रबोधनही महत्वाचे आहे

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

---

**प्रश्न क्रमांक 5 ते 8 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

अनेकांच्या मते केपरनिक देशद्रोहीच एनएफएलच्या प्रथेप्रमाणे वाजवल्या जाणाऱ्या राष्ट्रगीताच्या वेळी एप्रिल 2016 मध्ये त्याने हा कथित देशद्रोह केला. राष्ट्रगीतासाठी उभे राहणे सोडाच, हा गुडघ्यात वाकला मी हे मुद्दाम केले, निषेघ म्हणून केले, असे वर म्हणला निषेध कशाचा ? आदल्या वर्षभरात अमेरिकेच्या अनेक शहरांत कृष्णवर्णीय संशयितांना पोलिसांनी गुन्हेगार समजून सरळ गोळया घालून जिवे मारले त्या खोटया चकमकींचा निषेध गोऱ्या गुन्हेगारांनाही फार तर माथेफिरू ठरवून बचावाची संधी दिली जाते आणि काळयांना मात्र गुन्हेगारच समजले जाते, या भेदभावकारक व्यवस्थेचा निषेध आणि ही व्यवस्था बदलू पाहणाऱ्यांची टर उडवणारे डोनाल्ड ट्रम्पसारखे नेतृत्व ज्या अमेरिकी बहुमतामुळे उद्याला येते आणि सत्तापद मिळवते, त्या बहुमताचासुध्दा निषेधच त्यापुढल्या वर्षी केपरनिकला एनएफएलमधून वगळण्यात आले. तर याने न्यायालयात फिर्याद गुदरली ट्रम्प यांच्या उजव्या विचारांशी एनएफएलची हातमिळवणी असल्यामुळेच ते मला वगळतात, असे केपरनिकचे म्हणणे ही फिर्याद जवळपास सव्वा वर्ष केवळ विचारधीन होती. पण ती रीतसर सुनावणीला घ्यावी असा निर्णय आठवडयापर्वी 30 ऑगस्ट रोजी न्यायालयाल झाला. नायकी कंपनीशी केपरनिकचा करार झाला आहे, नायकीच्या पुढल्या जाहिरात मोहिमेसाठी केपरनिक हा आवाहक - ब्रँड ॲम्बॅसेडर - आहे, याची कल्पनाही तेव्हा कुणाला नव्हती एनएफएल स्पर्धेतील सर्वच्या सर्व संघाचे कपडे पुढील आठ वर्षांसाठी नायकीचेच असतील असा करार नायकी व एनएफएल यांच्यात झालाय हे मात्र साऱ्यांनाच माहित होते. अमेरिकी गोऱ्यांचे कौतुक असे की, त्यांनी केपरनिक हा नायकीचा ब्रँड ॲम्बॅसेडर झाल्याबद्दल आदळआपट केली असली, तरी त्याची फिर्याद ऐकणारी न्याययंत्रणा नायकीपुढे झुकली असेल यासारखा वाह्यात अपप्रचार केलेला नाही. या विरोधकांनी नायकीच्या मालावर बहिष्कार टाकला, कथित देशप्रेमी महाविद्यालये वा संस्थांतून नायकीचे कपडे बाद केल्याच्या बातम्या येऊ लागल्या आणि अनेक उत्साही ट्रम्पभक्तांनी समाजमाध्यमांतून 'मी पाहा कसे माझे नायकीचे बूट जाळतोय' याच्या चित्रमिती प्रसृत केल्या.

अमेरिकेतील गौरेतर खेळाडूंच्या राजकीय अभिव्यक्तीची चर्चा केवळ कॉलिन केपरनिकच्या निमित्ताने सुरू झाली असू समजायचे कारण नाही. बॉक्सर मोहम्मद आली, बेसबॉलपटू कट फ्लड हे या अभिव्यक्तीचे आद्य प्रवर्तक मोहम्मद अलीने कॅशस क्ले या नावाचा त्याग करून मोहम्मद आली हे नाव धारण केले कारण त्याच्या नजरेतून कॅशस क्ले हे गुलाम नाव होते ! त्या वेळी तो कडाडला होता 'मी अमेरिका आहे तुम्हाला ते मान्य नाही पण आता याची सवय करून घ्या. काळा, आत्मविश्वासपूर्ण उध्दट असा मी माझे नाव तुमचे नव्हे ! माझा धर्म तुमच्या नव्हे ! माझी स्वता:ची उद्दिष्टे आहेत. सवय करून घ्या' कर्ट फ्लडने आणखी वेगळा मुद्दा मांडला गोऱ्या प्रस्थापितांविरूध्द लढताना गौरेतर खेळाडूंना सर्वाधिक विरोध त्यांच्याच समाजातून होतो. 'कसला हा कृतघ्नपणा' असा त्यांचा सूर असतो. म्हणजे यशस्वी काळयांनीही मिळाले त्यातच समाधान 'मानून' घेतले, तर आणि तरच ते राष्ट्रप्रेमी आणि स्वातंत्र्यप्रेमी अमेरिकेचे प्रतीक ठरतात. अन्यथा नाही खेळामुळे अमेरिकी समाजातील दरी बुजू लागल्याचा खोटा आभास बंद करा, असे आता गौरेतर खेळाडू वारंवार बोलून दाखवू लागले आहेत, म्हणूनच जवळपास दोन डझन ग्रड स्लॅम स्पर्धा मारिया शारोपोवाचा क्रमांक पाचेक ग्रँड स्लॅम अजिंक्यपदेही नसताना वारंवार कसा लागतो असा प्रश्न सेरेनाही विचारू लागली आहे. महान काळा टेनिसपटू आर्थर ॲशने एकदा म्हटले होते, 'मला एखादा काळा माणूस बुध्दिबळ जगज्जेता झालेला पाहायचा आहे. पण आम्हाला कोणी तो खेळ खेळू तरी देतील का ?' यातील बोच बहुतांश गौरवणीयांना एक तर कळत नाही किंवा कळूनही ते प्रतिवाद करू पाहतात. गुन्हेगारी काळयांमध्येच जास्त कशी ? अमली पदार्थाच्या आहारी गेलेल्यांत काळेच जास्त कसे ? यासारखे नेहमीच तर्कट मांडले जाते. आपल्या समाजात दुफळी आहे आणि आपल्यामुळे ती वाढते आहे. याचे सोयरसुतकही असले प्रश्न विचारणाऱ्यांना नसते. आपले युक्तिवाद विवेकहीन असले तरी वरकरणी तार्किक भासतात, याचे खोटे समाधान त्यांना पुरते मग खेळाडूंनी फक्त खेळावे, राजकारण करू नये, असे दटावणीखोर युक्तिवादही खपून जातात ती सारी तर्कटे झुगारणाऱ्या सर्वाचा केपरनिका हा प्रतिनिधी ठरला आहे. हा स्वतंत्र आणि शुर व्यक्तीचा देश - 'लँड ऑफ द फ्री अँड होम ऑफ द ब्रेव्ह' हे अमेरिकी राष्ट्रगीतांचे पालूपद पण स्वातंत्र्य सर्वांनाच असेल, तर मग नातेही बरोबरीचे हवे ते नाही ही केपरनिकासारख्या अनेकांची खंत आहे. ती खंत त्याने राष्ट्रगीताचा अवमान करून व्यक्त केली. 'टुकडे टुकडे गँग' हा शब्द अमेरिकेत कुणाला माहितही नसेल. पण एखाद्याला देशद्रोही ठरवून आपण देशप्रेमी ठरण्याचा हुच्चपणा तिथेही आहे.

5. केपरनिक हा कोणत्या बाबीचा प्रतिनिधी ठरला ?

अ) प्रत्येक काळा समाज विघातक नसतो पण सारे समाजविघातक काळेच कसे ?

ब) खेळाडूंनी फक्त खेळावे, राजकारण करू नये असे युक्तीवाद

1) अ 2) ब 3) अ, ब 4) यापैकी नाही

6. नायकी व एनएफएल यांच्यात कोणता करार झाला होता ?

अ) नायकीच्या जाहिरात मोहिमेसाठी केपरनिक हा आवाहक ब्रँड ॲम्बॅसेडर होता ?

ब) एनएफएल स्पर्धेतील सर्व संघांचे कपडे आठ वर्षासाठी नायकीचेच असतील.

1) अ 2) ब 3) क 4) यापैकी नाही

7. केपरनिक या खेळाडूने राष्ट्रीयगीताच्या वेही निषेध केला कारण

अ) अमेरिकेत कृष्णवर्णीयांना जिवे मारले जाते ब) गोऱ्या गुन्हेगारांना बचावाची संधी दिली जाते

क) गोरे आणि कृष्णवर्णी या भेदभाव व्यवस्थेचा निषेध

1) अ, ब, क 2) अ, ब 3) ब, क 4) क

8. केपर निक या खेळाडूने कोणत्या राष्ट्रदोह केला होता ?

अ) प्रस्थापित गोऱ्या विरूध्द आवाज उठावला ब) राष्ट्रगिताचा अपमान केला

क) अमेरिकेच्या नेतृत्वाचा निषेध केला

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

**प्रश्न क्रमांक 9 ते 11 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

सन 2014 मध्ये सत्तेवर आल्यापासून सरकारने परराष्ट्र धोरणाची काही उद्दिष्टे निश्चित केली होती. यात 'नेबरहूड फर्स्ट या धोरणानुसार दक्षिण आशियातील देशांबरोबरचे संबंध वाढवले जाणार होते. पण या निर्धाराला सरकारने पुरेशा गांभीर्याने घेललेले दिसत नाही. परिणामी आज बहुतेक दक्षिण आशियाई देशांशी भारताने निष्कारण कटुता घेतल्याचे चित्र आहे. नेपाळसाठी नुकतीच चीनने त्यांची सगळी बंदरे इतर देशांशी व्यापार करण्यासाठी खुली केली आहेत. यासाठी नेपाळचे चीनधार्जिणे पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी अर्थातच पुढाकार घेतला होता. पण असे चीनधार्जिणे किंवा भारतविरेधी सरकार नेपाळमध्ये निवडून आले याला काही प्रमाणात भारत सरकारचे नेपाळ विषयक धोरणही कारणीभूत आहेच. नेपाळ आणि चीन यांच्यातील ताज्या कराराचे मुळ शोधण्यासाठी जरा मागे जावे लागेल ही सगळी प्रक्रिया सुरू झाली 2015 मध्ये त्या वर्षी भारताने नेपाळी सीमेवर नेपाळची अभूतपूर्व नाकेबंदी केली होती या नाकेबंदीमुळे नेपाळमध्ये इंधन, औषधांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला भारताने मधेशी आंदोलनाकडे बोट दाखवून हात वर केले होते. पण मधेशीचे प्रमाण अत्यल्प किंवा नगण्य असलेल्या काही सीमावर्ती भागांतही नेपाळमध्ये जाणारे ट्रक अडवले जातच होते. असे करून भारताने नेमके काय साधल हे कदाचित सरकारच सांगू शकतील पण नेपाळमधील सर्वसामान्य जनता यामुळे साहजिक दुखावली गेली. याचा फायदा ओलींसारख्या नेत्यांनी घेतला नसता, तरच नवब होते ओली यांनी 2016 मध्ये चीनशी बोलणी सुरू केली होती, ज्यांची परिणती नेपाळमध्ये चिनी रेल्वेचे काम सुरू होणे आणि नेपाळी मालासाठी चिनी बंदरे खुली होण्यात झाली यातले राजकारण बाजूला ठेवले, तरी अशा प्रकारची नाकेबंदी लक्षात घेऊन पर्यायी व्यापारी मार्गाच विचार करण्याची वेळ कोणत्याही नेपाळी पंतप्रधानावर आलीच असती. चीनने या पेचामध्ये संधी शोधली असेच म्हणावे लागेल. यातून नजीकच्या काळात तरी नेपाळचा चीनमार्गे व्यापार सुरळीत होईल, असे नव्हे भारतात मुख्यत्वे कोलकाता बंदरात नेपाळसाठी माल उतरवला जातो. काही प्रमाणात ही सोय विशाखापट्टणम बंदरातही आहे. याउलट चीनमधील नेपाळच्या दृष्टीने 'सर्वाधिक जवळचे' बंदरही 2600 किलोमीटर दूर आहे ! पण मुद्दा आता केवळ अंतराचा राहिलेला नाही. नेपाळ नवीन पर्यायाच्या शोधात होता आणि चिनने तो तत्परतेने पुरवला आहे आणि भारताचा आणखी एक शेजारी चीनचा मिंधा होऊ लागला आहे. पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव अशी ही शृंखला वाढत चालली आहे. नको तेथे धाकदपटशा आणि नको तेथे अनास्था असे भारताच्या दक्षिण आशिया नीतीचे अडखळते स्वरूप आहे 'बेल्ट' ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह', सारख्या (बीआरआय) उपक्रमांनी चीन आजूबाजूच्या देशांवर सावकारी साम्राज्यवाद लादू इच्छित आहे. ही बाब भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर साधार, सोदाहरण, अधिक खमकेपणे मांडायला हवी मालदीवसारख्या देशाने भारताची लष्करी सामग्री धिक्कारली. श्रीलंकेने त्यांच्या एका बंदरात चिनी आण्विक पाणबुडीला परवानगी दिली. पाकिस्तान वगळता इतर दक्षिण आशियाई देशांमध्ये भारताविषयी इतकी कटुता कधीही नव्हती. चीनविषयी त्यांना ममत्व नव्हते, उलट संशयच होता. आज परिस्थिती कशी फिरली याचा विचार करण्याची फारशी फिकीर विद्यामान सरकारला आहे. असे वरकरणी तरी दिसत नाही उद्या या सगळया नाराज आणि गरजू देशांची एखादी चीनप्रणीत लष्करी संघटना झाल्यास आश्चर्य वाटायला नको.

9. पुढील विधाने लक्षात घ्या.

अ) 2014 मध्ये भारत सरकारने परराष्ट्र धोरणानुसार दक्षिण आशियातील देशांबाबत गांभिर्य दाखवले नाही

ब) 2015 मध्ये भारताने नेपाळची नाकेबंदी केल्यामुळे नेपाळमध्ये सर्वसामान्य जनता चीनच्या बाजूने गेली.

वरीलपैकी कोणते विधान सत्य / असत्य आहे ते ओळखा.

1) दोन्ही असत्य 2) दोन्ही विधाने सत्य 3) अ व ब असत्य 4) अ असत्य ब सत्य

10. भारताचे दक्षिण आशिया धोरणाबाबतचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

1) दक्षिण आशियाई देशांकडे दुर्लक्ष 2) दक्षिण आशियाई देशांविरोधी भूमिका

3) दक्षिण आशियाई देशांबाबत अस्पष्ट धोरण 4) दक्षिण आशियाई देशांवर प्रभाव निर्माण करणे

11. लेखकाने भारतासाठी कोणता संभाव्य धोका वर्तवला आहे ?

1) दक्षिण आशियाई देश भारतापासून दूरावले जातील

2) पाकिस्तानला दहशत वादासाठी हे देश सहकार्य करतील

3) चीन या सर्व देशांना एकत्रित करून लष्करी संघटना उभारतील

4) या देशामधील भारतीय व्यापारावर विपरीत परिणाम होईल

**प्रश्न क्रमांक 12 ते 15 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

अटलबिहारी वाजपेयी यांच्या समाजकारणाची सुरूवात झाली दीनदयाळ उपाध्याय आणि श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे बोट धरून उपाध्याय संपादक असलेल्या नियतकालिकांसाठी वाजपेयी बातमीदार होते आणि नंतर मुखर्जी यांचे सहायक त्या वेळी पत्रकार आणि कार्यकर्ता यांत अंतर नसे त्यामुळे वाजपेयी दोन्हीही भूमिका सहज निभावू शकले. त्यांच्या समाजकारणास ठोस राजकीय वळण मिळाले. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर गांधी हत्येनंतर संघावर बंदी आली. साहजिकच संघविचाराने प्रेरित संबंधितांना नवा अवतार घ्यावा लागला. त्यातून भारतीय जनसंघाचा जन्म झाला. वाजपेयी त्याच्या काही मूळ संस्थापकांतील एक सुरूवातीलाच त्यांची पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून नियुक्ती झाली याच पक्षाचे श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जेव्हा काश्मिरात उपोषण केले तेव्हा त्यांच्यासमवेत अटलबिहारी होते. त्या आंदोलनादरम्यान मुखर्जी यांचे निधन झाले. त्यानंतर तीन वर्षानी 1957 साली अटलबिहारी पहिल्यांदा लोकसभेवर निवडूण आले. साहित्य, कला, संस्कृती यांचे प्रेम रक्तातूनच आलेले त्यास संघाच्या शिबिरांतून मिळालेल्या वक्तृत्व प्रशिक्षणाची जोड मिळाली. अटलबिहारी फुलू लागले. त्यांच्या या उमलण्याची पहिली दखल घेणारे होते पंडित जवाहरलाल नेहरू राजकीय प्रतिस्पर्धास वैरी मानण्याचा प्रघात पडायच्या आधीचे हे दिवस. त्यामुळे वाजपेयीच्या वक्तृत्वाची पंडितजीनी मुक्तकंठाने स्तृती केली आणि हा मुलगा उद्या देशाचे नेतृत्व करेल, अशी भविष्यवाणी उच्चारली.

ती तंतोतंत खरी ठरली पुढे जनसंघाचे आणि नंतर भाजपचे अध्यक्षपद अटलबिहारीकडे आले. भाजपाचा झालेला प्रसार औटघटकेचे पहिले पंतप्रधानपद, पुढे आलेले सरकार वगैरे सर्व तपशील हा इतिहासाचा भाग आहे. पण वाजपेयी त्या सनावळयांच्या इतिहासापेक्षा अधिक काही आहेत आणि ते समजून घेणे हे अधिक महत्वाचे आहे. याचे कारण वाजपेयी केवळ व्यक्ती नाही. ती हळूहळू नष्ट होत असलेली एक सर्वसमावेशी भारतीय प्रवृती आहे. या प्रवृत्तीत प्रतिस्पर्ध्याशी दोन हात करायचे असतातच. पण त्याच्या जिवावर उठायचे नसते. सर्व मंगल ते ते सर्व आपले आणि विरेधक मात्र अमंगलाचे धनी असे मानायचे नसते. त्याचमुळे 1974 साली इंदिरा गांधी यांनी जेव्हा पहिल्यांदा अणुस्फोट केला तेव्हा त्याचे समर्थन करणाऱ्यांत वाजपेयी आघाडीवर होते. एके काळी ज्या इंदिरा गांधी यांचे वर्णन वाजपेयी यांनी गूंगी गुडिया असे केले होते त्याच इंदिरा गांधी यांची बांगलादेश युध्दातील कामगिरी पाहून वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. पंतप्रधानपदी असताना कॉग्रेसशासित मध्यप्रदेशाने दुष्काळी मदतीची मागणी केली असता आणि स्थानिक भाजपाने मदत देऊ केली वर असल्या विषयावर राजकारण करू नये, असा पोक्त सल्ला स्वपक्षीयांना त्यांनी दिला. कट्टर प्रतिस्पर्धी कॉग्रेसचे नरसिंह राव पंतप्रधानपदी असताना संयुक्त राष्ट्र संघात भारताची भूमिका मांडण्यासाठी त्यांनी अटलबिहारी यांना पाठवले होते आणि ती भूमिका साकारत असताना आपल्या देशातील सरकारविरोधात परदेशी भूमीत वाजपेयी यांनी टिकेचा एक शब्ददेखील काढला नव्हता या शिकवणूकीचा पुढे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनाच विसर पडला हे दुर्दैव आणि ही बाब अलाहिदा पण वाजपेयी हे अशा उमदेपणाचे प्रतीक होते. स्वत: पंतप्रधानपदी असताना काही कारणांनी अमेरिकेचा दबाव वाढतो आहे असे दिसल्यावर त्यांनी त्या महासत्तेविरोधातील वातावरणनिर्मितीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे हरकिशनसिंग सुरजित यांची मदत घेतली. अमेरिका तक गुंजनी चाहिए, अशी मसलत दिली याच पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत शरद पवार यांच्या क्षमतांचा आदर ठेवत त्यांच्याकडे महत्वाची जबाबदारी देण्याचे औदार्य वाजपेयी यांच्या ठायी होते आणिबाणीत अन्य लोक नेत्यांप्रमाणे त्यांनाही तुरूंगवास घडला. पण पुढच्या राजकारणात इंदिरा गांधी यांचा त्यांनी दुस्वास केला असे कधी घडले नाही. इंदिरा चिरंजीव संजय याने मारूती मोटार प्रकल्पाचा घाट घातला आणि त्याचे जे काही झाले तेव्हा 'अब तो माँ रोजी है' अशी कोटी वाजपेयी यांनी केली पण त्यांच्याशी कधी बोलणे टाकले असे झाले नाही.

12. अटलबिहारी वाजपेयी हळूहळू नष्ट होत असलेली एक सर्व समावेशी भारतीय प्रवृत्ती आहे असे लेखक का म्हणतात कारण.

अ) कारण वाजपेयी यांनी राजकीय प्रतिस्पर्धीना वैरी मानले नाही

ब) वाजपेयी यांनी विरोधक हे फक्त अमंगलाचे धनी असे मानले नाही

क) वाजपेयी यांनी परदेशी भूमित सरकार विरोधी एक शब्दही काढला नाही

ड) वाजपेयी यांनी जनहिताच्या विषयांवर राजकारण केले नाही

1) अ, ब, ड 2) ब 3) अ, ड 4) अ, ब, क, ड

---

13. अटलबिहारी वाजपेयी यांचे कोणत्या राजकीय गुरूचा उल्लेख वरील उताऱ्यात आला आहे ?

अ) दीनदयाळ उपाध्याय ब) श्यामाप्रसाद मुखर्जी क) महात्मा गांधी ड) पंडित जवाहरलाल नेहरू

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, ब 4) क, ड

---

14. वरील उताऱ्यातून अटलबिहारी वाजपेयी यांच्यातील कोणते गुण दिसून येत नाही.

अ) समाजकारण ब) सत्ताकारण क) उमदेपणाचे प्रतिक ड) उत्कृष्ट संसद पटू

1) अ, ब 2) ब, ड 3) ब, क, ड 4) ड

---

15. खालील विधानांपैकी असत्य विधान / विधाने कोणते ते ओळखा ?

अ) वाजपेयी यांनी इंदिरा गांधी यांचे वर्णन गुंगी गुडिया असे केले

ब) वाजपेयी यांनी इंदिरा गांधीना दुर्गा असे म्हटले

क) राजकारणात इंदिरा गांधी यांचा वाजपेयी यांनी दुस्वास केला नाही

1) अ, ब 2) क 3) अ, ब, क 4) यापैकी नाही

---

**प्रश्न क्रमांक 16 ते 19 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

आजमितीस इस्रायल हे लोकशाही राष्ट्र आहे आणि त्या देशातील सर्व धर्मीय नागरिकांना समानाधिकार आहेत. प्राय: हा देश यहुदी धर्मीयांचा आहे हे जरी मान्य केले तरी या देशातील अरबांची संख्याही लक्षणीय आहे. सरकारची सूत्रे यहुदी धर्मीयांच्या हाती असली तरी अरबांना काहीच किंमत नाही, असे वातावरण त्या देशात नाही अनेक पदांवर अरबदेखील नेमले जातात. अशा वेळी या देशाच्या सरकारने टोकाचा निर्णय घेतला असून देशासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार यापुढे फक्त यहुदीनाच राहणार आहेत. याचा थोडक्यात अर्थ असा की त्या देशातील अरब, पॅलेस्टिनी वा अन्य अल्पसंख्याकांना त्या देशात कोणतेही स्थान असणार नाही असलेच तर ते केवळ दुय्यम नागरिकाचेच असेल. याचाच अर्थ स्वातंत्र्य हे एक मूल्य सोडले तर त्या देशातील नागरिक समान दर्जाचे राहणार नाहीत.

हे भयंकर आहे. इस्रायलसारख्या प्रगतिशील आधुनिक देशाने शेजारील अरबांइतका मागास निर्णय घ्यावा हे सध्याच्या जागतिक वातावरणास साजेसे असले तर उदविग्न करणारे आहे. त्या देशाने आधीच बळजबरी करून पॅलेस्टिनींना त्यांची न्याय भूमी देण्यास नकार दिला आहे. विद्यामान पंतप्रधान बेन्यामिन नेतान्याहू हे इस्रायली राष्ट्रवादाचा अर्क म्हणता येतील असे नेत्यान्याहू कमालीचे युध्दखोरदेखील आहेत. जागतिक मताची कोणतीही पर्वा न करता त्यांनी शेजारील पॅलेस्टिनी भूमी बळकावणे बिनदिक्कत सुरू ठेवले. सध्या जगात ठिकठिकाणी बहुसंख्याकवादाने अभद्र आणि विकृत स्वरूप धारण केल्याचे दिसते. इस्रायल हा त्याचाच एक नमुना वास्तविक नेतान्याहू यांच्यासारखे नेते सामान्य जनतेस राष्ट्रवाद या एकाच भावनेभोवती प्रक्षुब्ध ठेवून आपलीच पोळी भाजून घेत असतात. या अशा नेत्यांसाठी देशप्रेम वगैरे केवळ बोलायच्या गोष्टी देशप्रेम म्हटले की सामान्य नागरिकाची विचारशक्ती रजा घेते. इस्रायलमध्ये त्याचेच प्रत्यंतर येत असून या देशप्रेमी म्हणवणाऱ्या पंतप्रधानावरच अमाप संपत्ती केल्याचा आरोप आहे. नेतान्याहू यांच्या पत्नीचे अनेक उद्योग वादग्रस्त ठरले आहेत. तेव्हा या संगळयावरून सामान्य नागरिकाचे लक्ष विचलित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून असेल परंतु त्यांनी इस्रायल हा यहुदी देश म्हणून जाहीर करण्याचा निर्णय घेतला.

यांचे अनेक गंभीर परिणाम संभवतात. यामुळे त्या देशातील अरब आदी अल्पसंख्याकांत नाराजीची लाट निर्माण झाली नाही तरच नवल दुसऱ्याची भूमी जबरदस्तीने बळकावून ठेवायची आणि आपल्या भूमीतही त्याला स्थान द्यायचे नाही, असे हे राजकारण आहे त्यामुळे पश्चिम आशियात पुन्हा एकदा दहशतवादाचे थमान सुरू झाले तर आश्चर्याचे कारण नाही. या संदर्भात या देशाचे संस्थापक डेव्हिड बेन गुरियन यांनी दिलेला इशारा लक्षात घ्यायला हवा 1967 साली अरबांविरोधातील महत्वाचे युध्द जिंकल्यानंतर इस्रायलमध्ये जो राष्ट्रवादाचा उन्माद निर्माण झाला त्याची दखल घेत गुरियन यांनी आपल्या देशाच्या नेत्यांना अरबांची बळकावलेली भूमी परत देण्याची सूचना केली. 'तसे न करणे हे स्वहस्ते आत्मनाशाची बीजे पेरण्यासारखे आहे', असे गुरियन यांचे शब्द होते. आपल्या देशातील अल्पसंख्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक ठरवून इस्रायल सरकारने गुरियन यांचा इशारा खरा ठरेल अशीच व्यवस्था केली, असे म्हणता येईल. आता त्या देशाच्या पावलावर पाऊस टाकून अन्य अनेक देशांत अशीच खोटया राष्ट्रवादाची उबळ येणाची शक्यता नाकारता येत नाही.

इस्रायलप्रमाणेच जर्मनीतील काही मुठभरांनीही अशाच राष्ट्रवादाचे प्रदर्शन केले. परिणामी ओझीलसारख्या अव्वल दर्जाच्या फुटबॉलपटूवर राष्ट्रीय संघातून निवृती घेण्याची वेळ आली. जर्मन संघातून 92 सामने खेळलेल्या विश्वचषक मिळवून देण्यात महत्वाची कामगिरी बजावलेल्या या खेळाडूवर अशी वेळ आली त्यामागे जर्मनीतील वाढता वंशवाद कारणीभूत आहे. गेल्या काही वर्षात जर्मनीत नव नाझी म्हणवून घेण्याऱ्यांची चळवळ जोम धरत असून स्थलांतरित, अल्पसंख्य, अन्य वंशीय अशांना जर्मनीतून हाकलायला हवे, अशी त्यांची भूमिका आहे. ओझील याच्याबाबत असेच काहीचे घडले हा खेळाडू वंशाने तुर्क आणि धर्माने मुसलमान जन्म जर्मनीतला आणि पुढचे सारे कर्मही जर्मनीतच घडलेले. इतके दिवस सारे काही सुरळीत होते. प्रश्न निर्माण झाला तो नुकत्याच संपलेल्या विश्वचषक स्पर्धेत जर्मनीस दारूण पराभव सहन करावा लागल्यानंतर या स्पर्धेआधी ओझील याने तुर्कस्तानचे वादग्रस्त अध्यक्ष एर्दोगान यांची भेट घेतल. त्यावेळी तुर्कस्तानात निवडणुकीची हवा होती आणि एर्दोगान यांना आव्हान उभे राहील अशी अटकळ होती. तसे काही झाले नाही. सत्ता एर्दोगान यांच्याकडेच राहिली. अशा वेळी ओझील आणि एर्दोगान भेटीचा मुद्दा विस्मरणात गेला असता. परंतु तसे झाले नाही. कारण जर्मनीचा या स्पर्धेतला पराभव त्यासाठी जर्मन फुटबॉल संघटनेतील काहींनी ओझील यांच्यासारख्या खेळाडूस दोष देण्यास सुरूवात केली आणि त्याचा उल्लेख 'तुर्कवंशीय जर्मन खेळाडू' असा वारंवार केला जाऊ लागला. वास्तविक जर्मन संघात पोलंड आदी देशांतील खेळाडूदेखील आहेत परंतु त्यांचा उल्लेख कधी 'पोलिश वंशाचे जर्मन' अशा तऱ्हेने केला गेला नाही परंतु ओझील याच्याबाबत मात्र तसे वारंवार झाले "आपण मुसलमान आहोत म्हणून आपली अशा तऱ्हेने हेटाळणी होते" असे ओझील याचे म्हणणे. ते सहजपणे खोडून काढता येण्यासारखे नाही कारण जर्मन फुटबॉल संघटनेच्या काही पदाधिकाऱ्यांनी ओझील यांच्या जर्मन निष्ठांविषयीदेखील प्रश्न निर्माण केला "संघ जिंकतो तेव्हा माझा उल्लेख जर्मन असाज केला जातो आणि पराभूत झाला की मात्र मला स्थलांतरित म्हणून हिणवले जाते" अशा शब्दांत ओझील याने आपल्या वेदना व्यक्त केल्या आणि संघाचा निरोप घेतला.

16. जर्मन फूटबॉल पटू ओझील याने राष्ट्रीय संघातून निवृत्ती का घेतली ?

अ) जर्मन फुटबॉल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ओझील यांच्या जर्मन निष्ठांविषयी शंका घेतली होती

ब) जर्मनीत खोटया राष्ट्रवादाच्या परिणामामुळे

क) ओझिम याने तुर्कस्तानचे वादग्रस्त अध्यक्ष एर्दोगान यांची भेट घेतल्यामुळे

1) अ, ब, क 2) अ, ब 3) ब, क 4) क

---

17. 'इस्रायल सारख्या आधुनिक देशाने अल्पसंख्यांकाच्या विरोधात घेतलेला निर्णय हा जागतिक वातावरणास साजेसा आहे, असे लेखक का म्हणतात ?

अ) जगात सगळीकडेच अल्पसंख्यांकाना सत्तेत स्थान दिले जात नाही

ब) जगात बहुसंख्यवादाने विकृत स्वरूप धारण केल्याचे दिसते

क) जगात यहुदीसाठी हा निर्णय घेणे योग्यच होते

1) अ 2) ब 3) क 4) निश्चित सांगता येत नाही

---

18. लेखकाच्या मते इस्रायलच्या पंतप्रधानांनी इस्रायल हा यहुदी देश म्हणून जाहिर केला कारण

1) इस्रायल या देशात राष्ट्रवाद प्रबळ आहे 2) यहुदी समाज हा एकूण संख्येमध्ये सर्वाज जास्त आहे

3) स्वत: वरील आरोपांपासून सुटका करून घेण्यासाठी 4) पॅलेस्टिनीची भूमी त्यांना परत द्यायची नव्हती

---

19. इस्रायल या देशाचे संस्थापक डेव्हिड बेन गुरियन यांनी कोणता इशारा दिला होता ?

अ) आरवांची बळकावलेली भूमी परत करावी ब) अल्पसंख्यांकांना दुय्यम दर्जा देवू नये

क) राष्ट्रवादाचे राजकारण करू नये

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब

---

**प्रश्न क्रमांक 20 ते 23 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

देशात सर्वाधिक म्हणजे नऊशे धरणे उउअसलेल्या महाराष्ट्राची सिंचन क्षमता मात्र केवळ 13 टक्के एवढीच आहे. गेल्या दशकभरात या राज्याने किमान पाच वेळा तीव्र दुष्काळाशी सामना केला आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर इतका गंभीर झाला की, शेवटी रेल्वेने लातूरसारख्या शहराला पाणीपुरवठा करण्याची वेळ शासनावर आली. या पार्श्वभूमीवर भूजलाच्या पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणणारे नियम शासनाने तयार केले असून हे ऊशिराने का होईना परंतु आवश्यक असे पाऊल आहे. त्याचे स्वागत करत असतानाच, या नियमांचे उल्लंघन करण्याऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा शासनाने आधी उभी करणे अत्यंत आवश्यक आहे. पाऊसमान कमी झाल्यावर जमिनीला भोके पाडून विंधन विहिरी खोदण्यावर गेल्या काही दशकांत प्रचंड खर्च करण्यात आला. मराठवाडयासारख्या विभागात तर जमिनीची अक्षरश: चाळणी झाली. त्यामुळे भूजल पातळी वाढवण्यासाठी सामूहिक भूजल व्यवस्थापनाचा मार्ग शासनाने निवडला असून यापुढील काळात विहीर खोदण्यापासून जे त्यातील पाण्याच्या उपशापर्यंत अनेक प्रकारचे निर्बंध येतील ते राज्याच्या हिताचे आहेत, याचे भान पाण्यात अतिवापर करणाऱ्यांनी ठेवायला हवे. कालव्याच्या पाटाचे पाणी धाकाने किंवा पैसे चारून आपल्या शेतात आणण्याचे प्रयोग गेल्या अनेक दशकांपासून सुखेनैव सुरू आहेत. शेतात असलेल्या विहिरीच्या पाण्यावर

अनेक जण चैन करत आहेत आणि जिथे पाण्याचा थेंबही नाही, तिथे पाताळात जाऊन पाण्याच्य थेंबासाठी जिवाचे रान होत आहे ही परिस्थिती बदलण्यासाठी भूजलाची पातळी वाढवणे हे दूरगामी परिणाम करणारे असते. आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी पाण्याचा यथेच्छ गैरवापर करून तालुक्या - तालुक्यात भांडणे लावली आणि आपली सत्तेची पोळीही भाजून घेतली. धरणाच्या पाण्याबरोबरच भूजलाची काटेकोर वापर झाला, तर राज्यावरील दुष्काळाच्या संकटाशी सामना करण्याची किमान शक्ती निर्माण होऊ शकेल. पण गेल्या काही दशकांत शेतीच्या जमिनीचे अनेक तुकडे झाले. त्यामुळे प्रत्येक तुकडयात विहिरी खोदल्या जाऊ लागल्या. परिमाणी, भुजलाची पातळी आणखी खाली जाऊ लागली. हे चित्र बदलण्यासाठी कठोर नियम केले, तरी त्याची तेवढीच कणखर अंमलबजावणी करणे आवश्यक असते. या शासनाने त्याकडे लक्ष दिले तर येत्या काही वर्षात त्याचे परिणामही दिसू शकतील शहरी भागातील इमारतींना बांधकाम परवाना देताना पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा उभी करणे सक्तीचे केले आहे मात्र ज्या इमारतीत उभ्या आहेत, त्यांनाही अशी सक्ती करणे गरजेचे आहे. अनेक महापालिकांनी अशी यंत्रणा उभी करणाऱ्या गृहरचना संस्थांना स्थानिक करात काही सवलतीही देऊ केल्या आहेत. तरीही त्याकडे दुर्लक्ष करण्याचीच प्रवृती अधिक आहे. महाराष्ट्रात पावसाचे जवेढे पाणी पडते, त्यातील 50 टक्क्यांहून  अधिक पाणी अरबी समुद्रास मिळते. उर्वरित पाण्यावरच शेती, उद्योग  आणि पिण्याच्या पाण्यावर गुजराण करावी लागते. त्यातही या राज्यात सर्वाधिक पाणी लागणाऱ्या उसाच्या पिकावर अधिक मर्जी पाण्याचे राजकारण हा या राज्यातील सर्वात कळीचा मुद्दा आहे. राजकीय इच्छाशक्तीशिवाय पाण्याच्या वापरावरील निर्बंध अमलात येणे शक्य नसते. शासनाने त्या दृष्टीने निदान पहिले पाऊल तर टाकले आहे. ग्रामीण राजकारणाचा बाज बदलून टाकण्याची क्षमता असणाऱ्या या निर्णयाचे अभिनंदन करतानाच या खात्यातील सुमारे सव्वा लाख कर्मचाऱ्यांना कामाला लावण्याचे शिवधनुष्य शासनाला पेलावे लागणार आहे, याची नोंद करणे आवश्यक आहे.

20. शासनाने पाणी वाचवण्यासाठी कोणते नियम केले आहे ?

अ) 'पाणी आडवा पाणी जिरवा' या सारख्या योजनांवर भर देणे

ब) सामुहिक भूजल व्यवस्थापन करणे

क) शहरी भागात नवीन इमारत बांधकाम करतांना पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची यंत्रणा निर्माण करणे.

1) अ, ब　　2) ब, क　　3) अ　　4) अ, ब, क

---

21. लेखकाच्या मते भूजल पातळी खाली जाण्याचे कारणे कोणती आहेत ?

अ) पावसाचे पाणी आडवण्याची व जिरवण्याची व्यवस्था आपल्याकडे नाही

ब) पाण्याचे नियोजन काटेकोरपणे होत नाही

क) पाण्याचे वारंवार राजकारण केले जाते

ड) भूजलाच्या पाण्याच्या वापरावर आतापर्यंत नियंत्रण नव्हते

1) अ, ब　　2) अ, ब, ड　　3) ब, क　　4) अ, ब, क, ड

---

22. महाराष्ट्रात पाण्याची भिषण टंचाई जाणवते याची कारणे कोणती असावी ?

अ) 50% पावसाच्या पाण्याचा वापर होतो

ब) जास्तीत जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना प्राधान्य दिले जाते

क) पाणी मिळवण्यासाठी विहीरी खोदून जमिनीची चाळण केली आहे

1) अ, ब, क　　2) ब, क　　3) अ, क　　4) अ, ब

---

23. प्रस्तुत उताऱ्यास योग्य शिर्षक द्या

1) भूजल व्यवस्थापन काळाची गरज　　2) पाण्याचे नियोजन

3) जल नियोजनाचे पहिले पाऊल　　4) पाण्याचे राजकारण

---

**प्रश्न क्रमांक 24 ते 27 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

भारतीय विमान वाहतुकीच्या दृष्टीने 27 ऑगस्ट 2018 हा दिवस महत्वाचा ठरतो कारण या दिवशी स्पाइसजेट कंपनीच्या विमानाने डेहराडून ते नवी दिल्ली असा प्रवास अंशत: जैवइंधनाच्या बळावर केला. पारंपरिक जेट इंधनाच्या (एटीएफ) चढत्या किमती, त्यांच्यामळे आणि स्वस्तात तिकिटे विकण्याच्या असहायतेपायी देशातील अनेक विमान कंपन्यांन (जेट एअरवेज हे एक ठळक उदाहरण) लागलेली घरघर, पृथ्वीभोवतालच्या वातावरणाला बाधा पोहोचू नये यासाठी जेट इंधनाचा वापर टप्प्याटप्प्याने घटवण्यामागची अपरिहार्यता असे अनेक घटक विचारात घेतल्यास जैवइंधनांचा पर्याय स्वागतार्हच मानला पाहिजे पण यानिमित्ताने व्यक्त होत असलेला आशावाद अनाठायी ठरणार नाही याची दक्षता घ्यावीच लागेल. स्पाइसजेटच्या बम्बार्डियर क्यू 400 टबरेप्रॉप प्रकारातल्या विमानात 28 प्रवासी आणि कर्मचारी होते. 40 मिनिटांच्या उड्डाणादरम्यान या विमानाने 75 टक्के पारंपरिक इंधनाचा आणि 25 टक्के जैवइंधनाचा वयापर केला. विमान उड्डाणांसाठी बायोइंधनांचा प्रायोगिक तत्वावर वापर यापूर्वीही झालेला आहे 2008 मध्ये व्हर्जिन अटलांटिकच्या विमानाने लंडन ते ॲमस्टरडॅम असा प्रवास अंशत: जैवइधनाच्या आधारे केला होता. क्वान्टास या ऑस्ट्रेलियन विमान कंपनीने या वर्षी लॉस् एंजलिस ते मेलबर्न असा 15 तासांचा प्रदीर्घ प्रवास 10 टक्के जैवइंधनाच्या जोरावर केला. अलास्का एअरलाइन्स केएलएम

या कंपन्यांनीही असे प्रयोग करून झालेले आहेत. भारतात हा प्रयोग करण्यात डेहराडूनस्थित इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पेट्रोलियमचे योगदान महत्वाचे आहे. स्पाइसजेटच्या उड्डाणासाठी या संस्थेने खास 330 किलो जैवइंधन बनवले यासाठी छत्तीसगडमधील शेतकऱ्यांनी खास लागवड केलेल्या जॅट्रोफा वनस्पतीचा वापर करण्यात आला. अशा प्रकारे 50 टक्क्यांपर्यंत जैवइंधन उड्डाणांमध्ये वापरता येऊ शकते त्या प्रमाणापलीकडे जैवइंधन वापरल्याने उड्डाणक्षमतेवर परिणाम होऊ शकतो असे विश्लेषकांचे मत आहे. ते ध्यानात घेतल्यास, जैवइंधनामुळे पारंपारिक इंधनावरील अवलंबिता 50 टक्क्यांनी कमी होऊ शकते' असे स्पाइसजेटचे प्रमुख अजयसिंह म्हणतात, त्याचा खरा अर्थ कळेल विमान वाहतूक उद्योगाची सद्यस्थिती गंभीर आहे. हवाई इंधनाच्या चढत्या किमती, डॉलरच्या तुलनेत रूपयाचे घसरत चाललेले मूल्य, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तिकीट दरांमध्ये द्याव्या लागणाऱ्या भरमसाट सवलतींमुळे बहुतेक सर्व विमान कंपन्या तोटयात आहेत. एप्रिल - जून या तिमाहीत इंडिगो एअरलाइन्सच्या नफ्यात 97 टक्के घट झाली. स्पाइसजेटला 38 कोटी रूपयांचा तर जेट एअरवेजला 1323 कोटींचा तोटा झालेला आहे. जेट एअरवेजच्या इंधन खर्चातच तब्बल 35 टक्के वाढ झालेली आहे. अशा परिस्थितीत जैवइंधनाविषयी आशावाद निर्माण होणे स्वाभाविक आहे. परंतु सध्यातरी मोठया प्रमाणात जैवइंधन निर्माण होऊन त्याचा व्यापारी तत्वावर वापर विमान कंपन्यांना करता येईल अशी परिस्थिती सध्या तरी नाही. एम जर जैवइंधन हे पर्यायी इंधन असले तरी तो 'स्व्च्छ' पर्याय् ठरेलच याची कोणतीही शाश्वती नाही. सध्या जैवइंधनाचा सध्याचा एकमेव प्रमुख स्रोत असलेल्या जॅट्रोफा वनस्पतीवर अमेरिकी अंतराळ संशोधन संस्थेने (नासा) चार वर्षापूर्वी केलेल्या संशोधनाअंती आढळले की, या वनस्पतीच्या ज्वलनाने हरितगृह वायू उत्सर्जनाचे (ग्रीनहाऊस गॅस एमिशन) प्रामण वाढू किंवा घटूही शकते. जैवइंधनाची साठवणूक आणि वाहतूक ही तर स्वतंत्र आव्हाने आहेत शिवाय व्यापारी तत्वावर जैवइंधननिर्मिती करायची झाल्यास जॅट्रोफाची लागवड मोठया प्रमाणात करावी लागेल. या संभाव्य प्रचंड उत्पादनाचा इतर पिकांवर, जैवइंधनाला पारंपारिक इंधनाचा पर्याय म्हणून स्वीकारायचे का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. रक्कम वाढविण्याची तरतूद असलेले मोटार वाहन कायद्यातील दुरूस्ती सुचविणारे विधेयक पुन्हा राज्यसभेत रखडले हे विधेयक मंजुर व्हावे म्हणून केंद्रीय भूपृष्ट वाहतूकमंत्री नितिन गडकरी हे आग्रही असले तरी राज्यांचा अधिकारांवर गदा रेण्याचयी भिती व्यक्त करीत प्रादेशिक पक्षांनी पाठिंबा देण्यास नकार दिला. तृण्मलू कॉग्रेस, अण्णा दमुक किंवा तेलगू देसम हे प्रादेक पक्ष आपापल्या राज्यांच्या पश्नांवर लोकसभा अनेकदा वेठीस धरता. लोकसभेत कामकाजाच्या सुरूवातीलाच असणारा प्रश्नोत्तराचा तास तर अनेकदा गोंधळामुळे वाया जातो. कारण विरोधी पक्ष कामकाज सुरू होताच एखा प्रश्नावरून सरकारचे लक्ष वेधतात व त्यातून गोंधळ होतो. या वेळी प्रश्नोत्तराच्या तासातही उभय सभगृहांमध्ये चांगले कामकाज झाले सध्याच्या 16 व्या लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सर्वाधिक कामकाज झालेले हे पहिलेच अधिवेशन आहे. हा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. अविश्वास ठराव आणि राज्यसभेच्या उपसभापतिपदाच्या निवडणुकीच्या माध्यामातून सत्ताधारी भाजपाने विरोधकांवर मात केली पण त्याच वेळी राज्यसभा उपसभापतिपदाच्या निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणातील काही भाग कामकाजातून वगळावा लागला. काही अपशब्द किंवा एखाद्याची बदनामी करणारा उल्लेख सदस्यांनी केल्यास तो कामकाजातून वगळता जातो, पण पंतप्रधानांचे वक्तव्य कामकाजातून वगळण्याची वेळ यावी हे निश्चित योग्य नाही.

संसदीय इतिहासात असा प्रकार यापूर्वी दोनदाच घडला आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांना लोकसभेत मारलेल्या मिठीचे पडसाद उमटले आसाममधील राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा प्रसिध्द झालेला मसुदा जमावाकडून होणारी मारहाण समाज माध्यमांचा गैरवापर, देशातील पूरपरिस्थिती किंवा शेतीची सद्यःस्थिती अशा महत्वाच्या विषयांवर अधिवेशनात चर्चा झाली. संसदीय लोकशाही प्रणालीवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा, ही सर्व राजकीय पक्षांची जबाबदारी आहे.गोंधळापेक्षा चर्चेतून अधिक प्रश्न सुटत असले तरी राजकीय पक्षांची गणिते वेगळी असतात काही असो पावसाठी अधिवेशनात संसदेचे कामकाज झाले ही बातमी झाल !

24. भारतात जैवइंधनाची निर्मिती करण्यास कोणत्या अडचणीचा उल्लेख लेखकाने केला आहे ?

अ) जैवइंधन हे पर्यायी इंधन म्हणून स्वच्छ पर्याय ठरेलच याची शाश्वती नाही

ब) जैवइंधनाची साठवणूक व वाहतूक करणे अवघड आहे

क) जत्रोफाची या वनस्पतीची खूप मोठया प्रमाणावर लागवड केल्यामुळे इतर पिकांवर दुष्परिणाम होऊ शकतात.

1) अ 2) ब 3) क 4) यापैकी नाही

---

25. जैव इंधना बाबत....................

अ) जैव इंधन हे पारंपारिक इंधनाचा पर्याय होवू शकतो

ब) जैव इंधनामुळे पृथ्वीभोवतालच्या वातावरणाला हानी पोहचत नाही

क) जैव इंधन हे फक्त जत्रोफा वनस्पतीपासूनच मिळते

ड) जैव इंधन वापरण्यामुळे विमानाच्या उड्डाण क्षमतेवर परिणाम होवू शकतो

यापैकी कोणते विधान / विधाने असत्य आहे

1) अ, क, ड 2) क, ड 3) अ, ब 4) अ, ब, क

---

26. लेखकाच्या मते विमान कंपन्यांना का तोटा होत आहे ?

अ) जेट इंधनास पर्यायी इंधन उपलब्ध नाही
ब) जैव इंधन हा पारंपारिक इंधनाचा शाश्वत पर्याय नाही

1) अ 2) ब 3) अ, ब 4) यापैकी नाही

27. विमान कंपन्यांना तिकिट दरात का सवलत दयावी लागते ?

1) इंधन खर्च वाढल्यामुळे
2) प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी
3) डॉलरच्या तुलनेत रूपयाचे घसरन चालले मूल्य
4) जैव इंधनाचा फक्त जास्तीत जास्त 50% वापर होतो

**प्रश्न क्रमांक 28 ते 31 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

लेखकाचा धर्म काय? प्रचलित मतलबी वाऱ्यांची दिशा ओळखून त्याप्रमाणे लेखक बेतायचे आणि लोकप्रिय व्हायचे की अलौकिकाची आस बाळगायची? लोकप्रिय होणे तसे सोपे थोडीशी लेखनकला आणि बरेच सारे चातुर्य असले की आयुष्यभर लेखकराव म्हणून मिरवता येते. प्रचलित मूल्यांचे वार ज्या दिशेने वाहात असतील त्या दिशेचा वारा आपल्या गलबताच्या शिडांत भरून घ्यायचा की झाले. लोकप्रियतेच्या बंदरास मग आपसूक आपले जहाज लागते. त्या तुलनेत अलौकिकत्व तसे अंमळ अवघडच जखम वाहाती ठेवावी लागते सतत स्वत:च्या मनास कायम धार लावत राहावे लागते. हे धार लावणे म्हणजे प्रश्न विचारणे सतत ते देखील अपेक्षित प्रश्नसंचात न आढळणारे पुन्हा ते एकदा आणि एकालाच विचारून चालत नाही. प्रत्येक टप्प्यावर प्रत्येकास ते विचारावे लागतात पण ते वढयाने भागत नाही अशा प्रश्नांनी ओल्या राहणाऱ्या जखमेच्या वेदना आपल्या वाचकांच्या मनात पोहोचवाव्या लागतात ते एकदा जमले की उत्कट लेख म्हणून लोकप्रियतेची साय जमा होऊ लागते आणि लेखकाचा लेखकराव होऊ लागतो बरेचसे याच टप्प्यावर स्थिरावतात व्यवस्थेच्या विरोधाची हाळी घालून लक्ष वेधले गेले की मग स्वत:च व्यवस्था होऊ लागतात अशा अनेक लेखकांचे स्मृतिस्तंभ शेकडयांनी आहेत आपल्या आसपास अशा स्मृतिस्तंभांत स्वत:स थिजवून ठेवणे डोळसपणाने नाकारणारा उत्कट करकरीत लेखक म्हणजे सर विद्याधर सूरजप्रसाद ऊर्फ विदिआ नायपॉल मोठेपणा मोजण्याच्या चतुर मोजमापांत नायपॉल मावणारे नाहीत. म्हणजे त्यांना बुकर पारितोषिक मिळाले ते नोबेल सन्मानाने गौरविले गेले, चार्ल्स डिकन्स ते टोनी ब्लेअर यांच्यासारख्यांवर यथेच्छ टीका करूनही ब्रिटनने त्यांना 'सर' की देऊन गौरवले वगैरे मुद्दे तसे गौण बातमीच्या चौकटीपुरतेच, नायपॉल एवढयाच कारणामुळे मोठे नाहीत ते फार मोठे ठरतात कारण लेखकास मिळालेल्या प्रश्न विचारण्याच्या शापास त्यांनी कधीही उ:शाप शोधला नाही म्हणून हे प्रश्न त्यांनी मातृभूमी असलेल्या त्रिनिदाद देशास विचारले अंगात ज्या संस्कृतीचे रक्त होते त्या भारतास विचारले कर्मभूमी असलेल्या पाश्चात्य विश्वास विचारले आणि इस्लामसारख्या वरकरणी प्रश्नविरोधी वाटणाऱ्या संस्कृतीसही विचारले या प्रत्येकाविषयी नायपॉल यांच्या मनात एक प्रकारची घृणा होती आणि आपल्या करवती लेखणीने ते ती सतत मांडत राहिले असे करणे व्यावहारिकदृष्टया धोक्याचे असते. कारण बाजारपेठीय मोजमापांत अडकलेले चतुरजन नकारात्मकतेचा शिक्का कपाळावर मारतात. माध्यमेही तोच मिरवतात आणि मग लोकप्रियपण हाती येता येता निसटून जाते की काय अशी परिथिती तयार होते. इस्लामचे ते कडवे टीकाकार होते. एके काळी पाश्चात्य जीवनाचे त्यांना आकर्षण होते पण जे जीवन जगू लागल्यावर त्यांनी त्यावरही कठोर टीका केली. इंग्लंडचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांची संभावना तर त्यांनी चाचा (पायरेट) अशी केली (पण म्हणून त्यांना इंग्लंडने राष्ट्रविरोधी ठरवले नाही की देशातून हाकलून द्या अशी मागणीही तेथे कोणी केली नाही. असो) ई एम फॉर्स्टर, चार्ल्स डिकन्स यांनाही त्यांनी सोडले नाही. पाश्चात्य नजरेतून भारत वा आशियाई देशांकडे पाहणाऱ्यांची तर त्यांना घृणाच होती. तसे पाहणारे या देशातील कथित उच्च, उदात आध्यात्मिकादी परंपरांचे गोडवे गातात नायपॉल यांना ते मंजूर नव्हते. म्हणूनच आपल्या भारतभेटीनंतरच्या लेखनात त्यांनी तुडुंब वाहणारी गटारे, त्या आसपासच्या खुराडयात राहणाऱ्यांचे जगणे, आत्यंतिक बकालपणा आणि हातापायांच्या काडया आणि फुगलेली पोटे घेऊन हिंडणारी लहान मुले यांना आणणे टाळते नाही 'अ हाऊस फॉर मि. बिस्वास' या त्यांच्या अत्यंत लोकप्रिय कादंबरीच्या लेखनाने आलेल्या मनाच्या रिकामेपणात ते भारतात आले होते. त्यानंतरही ते अनेकदा आले ऐंशीच्या दशकात मुंबईतल्या भेटीत ते नामदेव ढसाळसमवेत मुंबई पालथी घातली आहे. वंचितांचे जगणे त्यांना अनुभवायचे होते. या भेटीत काही समाजकारण्यांच्या घरीही गेले. त्यांतील दोघे एका पक्षाशी संबंधित होते. एक दीड खोलीचे आयुष्य जगणारा आणि दुसरा बंडखोरीतून स्थिरावलेला त्या दीड खोलीत जगणाऱ्याकडे नायपॉल यांनी वैवाहिक सुखासाठी आवशयक एकांत मिळतो का अशी विचारणा केली होती तर दुसऱ्याकडे त्यांची ओढूनताणून पाहूणचार करण्याची हौस पाहून नायपॉल यांनी त्यास तुम्ही इतरांच्या समाधानासाठी का इतके झटता असे विचारले होते. पहिल्याने आपल्या वैवाहिक सुखाचे उदात्तीकरण केले आणि दुसऱ्याने भारतीयांसाठी पाहूणा कसा देवासमान असतो वगैरे पोपटपंची ऐकवली नायपॉल यांच्या लेखनात वेगळया रूपात हे सर्व आले. ते खरे होते कारण पुढे वैवाहिक सुखाची बढाई मारणाऱ्याने आपल्या पत्नीस मनोरूग्ण ठरवून दुसरा घरोबा केला आणि दुसरा संशयास्पद मार्गाने मिळवलेल्या संपत्तीसंचयाने मोठा होत गेला. एक खरा कलात्मक लेखक म्हणून नायपॉल या अशा संस्कृतीचे भाष्यकार होते.

28. मोठेपणा मोजण्याच्या चतूर मोजमापात नायपॉल मावणारे नाहीत असे लेखक का म्हणतात ?

1) कारण ते खूपच लोकप्रिय मताचे लेखक होते

2) लेखकास मिळालेल्या प्रश्न विचारण्याच्या शापास त्यांनी कधीही उ:थाप शोधला नाही

3) बाजारपेठीय मोजमापात न अडकता त्यांच्या हाती लोकप्रियपण आले

4) व्यवस्थेच्या विरोधाची हाळी घालून स्वत:ची व्यवस्था करणे

---

29. नायपॉल आपल्या लेखनात भारतातील कोणत्य लक्षणांचे वर्णन करत नाही

| | |
|---|---|
| अ) भारतीय सामाजिक व्यवस्था | ब) तुंडुब वाहणारे गटारे |
| क) राहणी मानातील बकाळपणा | क) लहान मुलांचे कुपोषण |

1) ब, क, ड  2) अ  3) अ, ड  4) अ, ब, क, ड

---

30. लेखकाच्या मते नायपॉल यांच्यात खालीलपैकी कोणते गूण दिसून येत नाही ?

अ) परखड लेखन रौलीच्या माध्यमातून सकारात्मकता साधणे

ब) व्यावहारीकदृष्टया नकारत्मक लेखन

क) व्यवस्थे विरोधी लेखन

1) अ  2) ब  3) अ, क  4) अ, ब, क

---

31. प्रस्तुत उताऱ्यास योग्य शिर्षक द्या

1) संस्कृतीचे भाष्यकार  2) नकाराचा भाष्यकार  3) वास्तवाचा भाष्यकार  4)लेखकअन लोकप्रियता

---

**प्रश्न क्रमांक 32 ते 34 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

पालकांनी तक्रार केली, की मुलांवर अभ्यासाचा फार ताण येतो. मग त्यांना बाकी काहीच करायला वेळ मिळत नाही. शिक्षकांनीही मग या मागणीला होकर भरला. देशाच्या शिक्षणमंत्र्यांनी लगेचच होकार देत दहा ते पंधरा टक्क्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या अभ्यासक्रमात कपात करण्याचा आदेश काढला. पुढील शैक्षणिक वर्षापासून तो अमलात येईल. त्यामुळे मुलांना कमी अभ्यास करावा लागेल शिकवणीच्या वर्गाला जाता येईल, स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासालाही वेळ मिळेल. काय शिकतो आणि काय समजते आहे यापेक्षा परीक्षेत किती गुण मिळतात, हे महत्वाचे वाटणारे पालक, शिक्षक आणि राज्यकर्ते ज्या देशात आहेत तेथे असे सगळयांना बरोबर घेऊन जाण्याच्या नादात शिक्षणाचे साधारणीकरण सुरू होते. विशिष्ट वयातल्या मुलांच्या मेंदुला पेलवेल असा अभ्यासक्रम असावा हे म्हणणे कोणीच नाकारणार नाही. गेली अनेक दशके अभ्यासक्रमांची रचना बदलताना याचा विचार केला जात असल्याचे निदान सांगण्यात तरी येत होते. बीजगणित, भूमिती, विज्ञान, भाषा, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हेच विषय अजूनही अभ्यासक्रमाच्या गाभ्याशी राहिले आहेत. स्पर्धेच्या जगात किती माहिती मेंदूत साठवायची आणि ऐन परीक्षेच्या वेळी ती नेमकेपणाने आठवायची याचा ताण जर विद्यार्थ्यांवर येत असेल तर त्यांचे भावी आयुष्य अधिक अडचणींचे असेल केवळ अभियांत्रिकी, वैद्यकीयचय नव्हे, तर व्यवस्थापन, चार्टर्ड अकौंटन्सी यांसारख्या अभ्यासक्रमांसाठी काही हजार पाने किमान वाचावी लागतात, समजून घ्यावी लागतात, लक्षातही ठेवावी लागतात. याचा ताण घेण्याचीही सवय करावी लागते. परंतु पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील शिकवण्यांची काळजी अधिक केवळ शाळा वा महाविद्यालयात जाऊन आपला पाल्य जीवनात काहीच साध्य करू शकणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास त्यामुळे अभ्यासाव्यतिरिक्त खेळ, संगीत, वाचन या गोष्टींपेक्षाही परीक्षेत अधिकाधिक गुण मिळवण्याच्या शर्यतीत पाल्य कसा जिंकू शकेल, याचाच त्यांना अधिक घोर. केवळ अधिक गुण मिळवून स्पर्धा जिंकणे हेच जर जीवनाचे ध्येय आणि सार असेल, तर कितीही कमी अभ्यासक्रम ठेवला, तरीही त्याचे स्वागतच होत राहणार राजकारणात लोकांच्या दबावाखाली अनेक मागण्या मान्य केल्या जातात. असा लोकानुनय आता शिक्षणातही दिसू लागला आहे, असा मनुष्यबळ विकासमंत्री यांच्या निर्णयाचा अर्थ निघू शकतो मुळात अभ्यासक्रमाचा खरोखरीच बोजा होता काय, याचा अभ्यास करण्याऐवजी केवळ लाखभरांनी तक्रार केली म्हणून बोजा कमी करण्याचा निर्णय् घेणे हेच अशैक्षणिक आहे. सारे जग अधिक गुंतागुंतीकडे चालले असताना आपण मात्र अधिक सोपे होण्याचा प्रयत्न करणे हे शहाणपणाचे नव्हे भूगोल, इतिहास, नागरिकशास्त्र हे विषय कशाला हवेत अशी चर्चा अनेक वर्षे सुरू आहे मोठया प्रमाणावर मागणी झालीच, तर तेही बंद होतील. जगातील सर्वात मोठी शिक्षणव्यवस्था असलेल्या भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या साडेतीन कोटींच्या घरात आहे. या सगळया विद्यार्थ्यांना सुजाण नागरिक बनवणारी शिक्षणव्यवस्था उभारणे आवश्यक आहे. परंतु अभ्यासक्रमांचा बोजा उतरवणे हे त्यावरील ठोस उत्तर असू शकत नाही. परिक्षाच नकोतपासून ते सोप्या प्रश्नपत्रिका आणि गुण देणारी उत्तरपत्रिका तपासणी अशा लंबकात अडकलेली भारतीय शिक्षणव्यवस्था आता लोकानुनयाच्या वाटेने चालली आहे.

32. प्रस्तूत उताऱ्यामधून लेखकास कोणत्या महत्वाच्या बाबी सुचवायच्या आहेत ?

अ) विद्यार्थ्यांना सुजाण नागरिक बनवणारी शिक्षण व्यवस्था उभी केली जावी

ब) सारासार विचार न करता फक्त लोकांच्या दबावानुसार अभ्यासाचा बोजा कमी करू नये

क) विद्यार्थ्यांना जास्तीचा अभ्यास करण्याची सवय असली पाहिजे

ड) विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर कलात्मक विषयांनाही महत्व द्यावे

1) अ, ब 2) क, ड 3) अ, ब, क 4) अ, ब, क, ड

33. लेखकाच्या मते आजच्या विद्यार्थ्यांचे भावी आयुष्य अधिक अडचणीचे का असू शकते ?

अ) आजच्या विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा फार ताण येतो

ब) आजचा अभ्यास विद्यार्थ्यांना पेलवेल असा नाही

क) विद्यार्थ्यांना अभ्यासाचा ताण घेण्याची सवय राहिली नाही

ड) अभ्यासक्रम अधिक सोपा करण्याचे धोरण अवलंबल्यामुळे

1) अ, ब 2) क, ड 3) अ, क 4) ब, ड

34. लेखकाच्या मते कोणते निर्णय चुकीचे आहेत ?

अ) लोकांच्या दबावाचा परिणाम शैक्षणिक कार्यात होतो ब) अभ्यासक्रम अधिक सोपा करण्याचा प्रयत्न करणे

क) परिक्षेतच अधिक गुण मिळवणे हे ध्येय असणे

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) अ, ब, क

**प्रश्न क्रमांक 35 ते 38 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

सध्या आपल्याकडे इंटरनेटबंदीचे प्रकार मोठया प्रमाणावर वाढू लागले असून हे व्यक्ती आणि समाजाच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे. याचे कारण हे केवळ संपर्क माध्यम नाही. व्यक्तीच्या अभिव्यक्तीपासून आर्थिक देवाणघेवाणीपर्यंत अलीकडे इंटरनेट हे अनिवार्य झालेले आहे. परंतु यंदाच्या - 2018 च्या पहिल्या वर्षात 79 वेळा विविध ठिकाणी इंटरनेटबंदी करावी लागली होती. म्हणजे गेल्या संपूर्ण वर्षात जितक्या वेळेस हे झाले त्यापेक्षा अधिक वेळेत ही बंदी सात महिन्यांतच घातली गेली. आधुनिक युगात इंटरनेटबंदी म्हणजे मुस्कटदाबी तिची कारणे काहीही असोत. पण संपूर्ण प्रदेशातील इंटरनेट बंद करणे याचा अर्थ त्य समाजाची एका अर्थी मुस्कटदाबीचा काही वर्षा पूर्वी एखाद्या परिसरात वर्तमानपत्राच्या वितरणावर बंदी घालणे किंवा एखाद्या वृत्तवाहिनीचे प्रसारण रोखणे हे जसे मुस्कटदाबीचे लक्षण मानले गेले असते त्याच गांभीर्याने इंटरनेटबंदीच्या निर्णयाकडे पाहायला हयवे. अशी बंदी घालणाऱ्या व्यवस्थेचे म्हणजे सरकारचे या संदर्भात एक समर्थन असते. अफवा पसरवल्या जाऊ नयेत म्हणून अथवा हिंसाचारात तेल ओतले जाऊ नये म्हणून इंटरनेटवर बंदी घातली असे सरकार म्हणते. व्हॉटसॲप आदींचा वापर हा बहुश: अशाच तऱ्हेच्या अफवा पसरवण्यासाठी अथवा निर्बुध्द आणि निरूपयोगी माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी केला जातो हे खरे असल्याने सरकारच्या या म्हणण्यात काहीच तथ्य नाही असे नाही तरीही संपूर्ण प्रदेशातच इंटरनेटबंदी जारी करणे हे संचारबंदीसारखेच आहे

जम्मू - काश्मिर राज्यात यंदाच्या वर्षात विविध ठिकाणी मिळून इंटरनेटबंदीचे तब्बल 36 प्रकार घडले. याचा अर्थ महिन्याला सरासरी पाच वेळा ही अशी बंदी त्या राज्यात घातली गेली. सीमावर्ती राज्य आणि धगधगती समस्या लक्षात घेता या बंदीचे समर्थन केंद्र सरकार करेल. ते वादासाठी योग्य आहे असे समजा मानले तर मग राजस्थानसारख्या राज्याचे काय ?

त्या राज्यातही यंदाच्या सात महिन्यांत 26 वेळा इंटरनेटबंदी घातली गेली. उत्तर प्रदेशात हे सात वेळा घडले गेल्या वर्षी या राज्यात असे प्रकार फक्त दोन वेळाच घडले होते. या सगळयांच्या तुलनेत महाराष्ट्र हे एक सुशासित राज्य परंतु यंदा महाराष्ट्रातही इंटरनेटबंदीचे पाच प्रसंग घडले अलीकडे नवी मुंबई शहर आणि परिसरात अशी इंटरनेटबंदी सरकारला करावी लागली प्रसंग होता मराठा आंदोलनाच्या निमित्ताने देण्यात आलेली मुंबई बंदची हाक या बंदला हिंसक वळण लागल्याने सरकारला इंटरनेटबंदी करावी लागली परंतु यातील अत्यंतिक विरोधाभास असा की महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचे माहिती तंत्रज्ञान उद्योग केंद्र याच परिसरात असून जगातील प्रमुख माहिती कंपन्यांचे महत्वाचे व्यवहार तेथून चालतात त्याचप्रमाणे एका खासगी दुरसंचार कंपनीच माहिती केंद्रही याच परिसरात आहे. पुण्याजवळील हिंजेवाडी येथे राज्यातीलच नव्हे तर देशातील सर्वात मोठी माहिती कंपन्यांची वसाहत आहे. त्या परिसरासही इंटरनेटबंदीचा सामना करावा लागला अशा तऱ्हेने देशात गेल्या सात वर्षात 233 वेळा इंटरनेटबंदी लादण्याची वेळ आली परंतु यातील 67 टक्के बंदी प्रकार गेल्या 18 महिन्यांत घडलेले आहेत. हे काय दर्शवते ?

याचा विचार व्हायला हवा. इंटरनेट म्हणजे केवळ फेसबुक वा टविटर नव्हेत या छचोर माध्यमांच्या पलीकडे अत्यंत गांभीर्याने इंटरनेटचा वापर होत असतो. एखाद्या रूग्णालयातील शल्यक इंटरनेटव्दारेच अन्य कोणा तज्ज्ञाशी संपर्क साधून एखाद्या रूग्णाचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करीत असतात, बँका आर्थिक उलाढाल करीत असतात. कोणी तरी जवळच्याचे शुल्क याच इंटरनेटव्दारे भरत असतो आणि कोणाच्या तरी खात्यात त्याच्या कष्टाचे वेतन याच इंटरनेटच्या माध्यमातून येत असते. अशा परिस्थितीत इंटरनेटवर बंदी घातली गेली की या सर्वच व्यवहारांना त्याचा फटका बसतो. ते ठप्प होतात. काही रिकामटेकडया आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांमुळे समस्त परिसरावर इंटरनेटबंदी लादणे म्हणजे डासांचा उपद्रव होतो म्हणून घर पेटवून देणे. अलीकडे हे वारंवार होत असेल तर ती व्यक्तीच्या स्वातंत्र्यावरील थेट अतिक्रमण आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे

35. लेखकाचा उतारा लिहण्यामागचा हेतू कोणता ?

1) सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून मुस्कटदाबी करू नये

2) इंटरनेट बंदी करून व्यक्ती आणि समाजाच्या स्वातंत्र्यावर गदा आणू नये

3) इंटरनेट हे संपर्क साधन नसून व्यवहारासाठी अनिवार्य आहे

4) कोणत्याही प्रसंगास्तव संपूर्ण प्रदेशात इंटरनेट बंदी करू नये

---

36. 'डासांचा उपद्रव होतो म्हणून घर पेटवून देणे' हे उदाहरण देण्यामागे लेखकाचे प्रयोजन काय ?

अ) इंटरनेट बंदी घातली गेली की सर्वच व्यवहारांवर त्यांचा प्रतिकुल परिणाम होतो

ब) सध्याच्या काळात इंटरनेट बंदी म्हणजे मुस्कटदाबी

क) थोडयाफार गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांमुळे संपूर्ण परिसरावर इंटरनेट बंदी लावणे

1) अ, ब    2) अ, क    3) ब    4) क

---

37. खालीलपैकी सत्य विधान / विधाने कोणते ते ओळखा ?

अ) इतर माध्यमा प्रमाणेच इंटरनेटचा उपयोग होतो

ब) जम्मु - काश्मिर येथील इंटरनेट बंदीचे समर्थन केंद्रसरकार करू शकते

क) इंटरनेट बंदीमुळे माहिती तंत्रज्ञान आणि उद्योग केंद्राला मोठा फटका बसतो

1) अ, ब    2) क    3) अ आणि क    4) ब, क

---

38. प्रस्तूत उताऱ्यात सरकारच्या म्हणण्यानुसार

अ) आफवा पसरवल्या जाऊ नयेत म्हणून इंटरनेट बंदी योग्य

ब) हिंसाचारात वाढ होऊ नये म्हणून इंटरनेट बंदी योग्य

1) दोन्ही विधाने अयोग्य    2) दोन्ही विधाने योग्य

3) अ योग्य, ब अयोग्य    4) निश्चित ठरवता येत नाही

---

**प्रश्न क्रमांक 39 ते 40 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावावयाचे असले तरी किती त्रास पडतो हे सर्वास माहित आहेच पण हेच दगड चुन्यात पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो आणि त्यांतही पहिली इमारत बांधल्यापासून बरीच वर्षे लोटली असली व चुन्याच्या आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते हे कोणास सांगावयाला पाहिजे असे नाही, तात्पर्य  कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यापासून एक पिंड केला असता तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणे हे अतिशय कष्टाचे काम आहे हे प्रत्येकाने कबूल केले पाहिजे सामाजिक घडामोडीचाही असाच प्रकार आहे प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा आरंभी हे शरीर समजातीय द्रवयाचे झालेले असून पुढे ते जसजसे वाढत जाते तसतसे त्यांत विषमजातित्व उत्पन्न होते व ज्या मानाने त्यात विषमजातित्व उत्पन्न होते. त्या मानाने त्यात अधिकाधिक दाढर्य उत्पन्न होऊन बाहय संस्कारात ते अधिकाधिक प्रतिबंध करू लागते. कोवळे वेळू, लहान झाडांच्या फांद्या किंवा तरूण मुलांचे अवयव यात किती लवचिकपणा असतो बरे ! वाढ खुंटून प्रत्येक अवयवात काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चांगली कसरत शिकता येत नाही, ही प्रत्येकाच्या पाहण्यातली गोष्ट आहे. सामाजिक शरीरातही परिणतीमुळे अशाच तऱ्हेचे काठिण्य उदभूत होते. कोणताही समाज एकदा वाढीस लागला आणि श्रमविभगामुळे त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झाले व त्यात निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळया क्रिया करू लागले म्हणजे त्याचे रूपांतर करू पाहण्याऱ्या गोष्टीस त्याकडून मोठा प्रतिबंध होऊ लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार या संबंधाने ज्या रीती एकदा रूढ होऊन जातात त्यात फिरून बदल करणे अत्यंत दुरापास्त होऊ लागते, पुर्वापार चालत आलेल्या चालीत विचारदृष्टया कितीही विसंगतता दिसली तरी त्या सोडणे किती जिवावर येते हे बाल - विवाह, केशवपन, सुतक इत्यादी प्ररूढ चालीचा विचारकरता तेव्हांच लक्षात येणार आहे. समाजातील शेकडो नव्याण्णव लोकांची स्थिती अंधपरंपरेप्रमाणे असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानेसुध्दा आपणावर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल असा धाक त्यास क्षणोक्षणी वाटत असतो

39. लवचिकपणा कोणता असतो ?

1) सामाजिक घडामोडीत    2) शरीर रचनेत

2) बाहयरचनेत    4) कोवळे वेळू, झाडांच्या फांद्या तरूण मुलांचे अवयव

---

40. कोणत्या संबंधाने रीती रूढ होतात ?

1) चालीरितीमुळे    2) सामाजिक संकेतामुळे    3) रीतीभातीमुळे    4) राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार

---

**Read the following passage and answer the question from 41 to 43:**

Marketing executives in television work with a relatively stable advertising medium. In many ways, the television ads aired today are similar to those aired two decades ago. Most television ads still feature actors, still run 30 or 60 seconds, and still show a product. However, the differing dynamics of the internet pose unique challenges to advertisers, forcing them to adapt their practices and techniques on a regular basis.

In the early days of internet marketing, online advertisers employed banner and pop-up ads to attract customers. These techniques reached large audiences, generate many sales leads, and came at a low cost. However, a small number of Internet users began to consider these advertising techniques intrusive and annoying. Yet because marketing strategies relying heavily on banners and pop-ups produced results, companies invested growing amounts of money into purchasing these ad types in hopes of capturing market share in the burgeoning online economy. As consumers became more sophisticated, frustration with these online advertising techniques grew. Independent programmers began to develop tools that blocked banner and pop-up ads. The popularity of these tools exploded when the search engine Google, at the time an increasingly popular website fighting to solidify its place on the Internet with giants Microsoft and Yahoo, offered free software enabling users to block pop-up ads. The backlash against banner ads grew as new web browsers provided users the ability to block image-based ads such as banner ads. Although banner and pop-up ads still exits, they are far less prominent than during the early days of the Internet.

A major development in online marketing came with the introduction of pay-per-click ads. Unlike banner or pop-up ads, which originally required companies to pay every time a website visitor saw an ad, pay-per-click ads allowed companies to pay only when an interested potential customer clicked on an ad. More importantly, however, these ads circumvented the pop-up and banner blockers. As a result of these advantages and the incredible growth in the use of search engines, which provide excellent venues for pay-per-click advertising, companies began turning to pay-per-click marketing in droves. However, as whit the banner and pop-up ads that preceded them, pay-per-click ads came with their drawbacks. When companies began pouring billions of dollars into this emerging medium, online advertising specialists started to notice the presence of what would later be called click fraud: representatives of a company with no interest in the product advertised by a competitor click on the competitor's ads simply to increase the marketing cost of the competitor. Click fraud grew so rapidly that marketers sought to diversify their online positions away from pay-per-click marketing through new mediums.

Although pay-per-click advertising remains a common and effective advertising tool, marketers adapted yet again to the changing dynamics of the Internet by adopting new techniques such as pay-per-performance advertising, search engine optimization, and affiliate marketing. As the pace of the Internet's evolution increases, it seems all the more likely that advertising successfully on the Internet will require a strategy that shuns constancy and embraces change.

41. The author implies what about the future of pay-per-performance advertising?
1) Although it improves on pay-per-click advertising, it is still vulnerable to click fraud
2) It will one day became extinct as internet users discover drawbacks with it
3) Internet users will develop free software to block its effectiveness
4) It will eventually become less popular with advertisers as the Internet evolves and drawbacks emerge

42. According to the passage, which of the following best describes the current status of pop-up as?
1) Widely used 2) Less popular now than at earlier times
3) A frequent target of click fraud 4) Non- existent due to pop-up blockers

43. The passage implies that which of the following attributes will be the most important for future success int online advertising:
1) Flexible creativity 2) Disciplined patience 3) Uniform approach 4) Ruthless tenacity

**Read the following passage and answer the question from 44 to 45:**

The Karnataka government's decision to file an appeal against the acquittal of the Tamil Nadu Chief Minister, Jayalalithaa, is bound to be welcomed by all those who value probity in public life and believe that the courts are the right forums to take forward issues relating to corruption tin high places. The Congress dispensation in in Karnataka understandably took its time to arrive at a decision on whether to file an appeal in the Supreme Court. It has gone by sound legal principles by examining the recommendations of the Special Public Prosecutor, the State's Advocate-General and the Law Department. The primary question it had to contend with was raised by the legal wing of the karnataka Pradesh congress Committee itself: what is Karnataka's interest in the outcome of the case? The argument was that the State had already discharged its duty by hosting the trial in Bengaluru, appointing a Special Judge and Special Public Prosecutor, obtaining a conviction in the trial stage and seeing it overturned by the High Court. Should the State go beyond this specified administrative function by filing an appeal in the Supreme Court, taking on the role of an aggrieved party? The question may appear valid, but to abandon a legal process midway is also untenable. The Supreme Court has made it clear that karnataka is now playing the role of the prosecuting State and has stepped into the shoes of Tamil Nadu. Its duty now includes taking up the mantle of the aggrieved party and pursuing the legal process to its logical end

Moreover, the Karnataka High Court judgment acquitting the Tamil Nadu Chief Minister is widely seen as flawed in many respects, especially in the computation of the quantum of 'disproportionate assets' that ultimately formed the basis of her acquittal. Special Public Prosecutor B.V. Acharya has said the arithmetical errors are glaringly obvious. Some aspects of the High Court's reasoning are controversial: it has included cash gifts of high value as legitimate income and given credence to a newspaper subscription scheme that had been termed fake by the trial court. It has gone zealously by a 1976 Supreme Court ruling that unexplained assets up to the value of 10 per cent of known income is acceptable, even though the anti-corruption law has since been amended to make disclosure as per statutory requirements the standard to assess legitimate income. The prosecution believes revisiting the computation itself will propel the quantum of 'disproportionate assets' beyond this 10 per cent limit. Overall, it will be in the public interest to has an authoritative Pronouncement by the highest court on whether the trial court or the High Court was right in appreciating all the evidence. It will also be in Ms. Jayalalithaa's own interest that her exoneration if She succeeds in sustaining ti ------ is a vindication that clears her political path rather than one that depends on a conclusion seen to be perennially under dispute and in the realms of legal debate.

44. Which of the following is true according to the passage ?
a) Special Public Prosecutor B.V. Acharya has said the arithmetical errors are glaringly obvious.
b) The Supreme Court has made it clear that Karnataka is now playing the role of the prosecuting State and has stepped into the shoes of Tamil Nadu.
c) The Karnataka High Court judgment acquitting the Tamil Nadu Chief Minister is widely seen as unflawed in many respects.
1) Only c and a   2) Only b and c   3) Only a and b   4) All a, b, c

---

45. Which of the following is not the synonym of the word "probity"?
1) Pathos   2) Wistful   3) Guile   4) Dishonest

---

46. सत्र शास्त्रीय नर्तक एक कार्यक्रमामध्ये सोमवार ते शनिवार असे कार्यक्रम सादर करणार आहेत. Q हा भारतनाटयम नर्तक क्रमश : कथ्थक व मोहिनीअट्टम नृत्य करण्याऱ्या P आणि T च्या नंतर नृत्य करेल. ओडीसी नर्तक S च्या नंतर R नृत्य करेल. एक मिश्रित शास्त्रीय नर्तक Q च्या नंतर आणि S च्या आधी नृत्य करले. जर कथकली सादरीकरण शनिवारी होणार असेल तर पुढीलपैकी नृत्यकार्यक्रम सादरीकरणाचा दिवस यांची कोणती जोडी योग्य आहे ?
1) ओडीसी - गुरवार   2) मोहिनी अट्टम - बुधवार   3) कथ्थक - सोमवार   4) मिश्र नृत्य - मंगळवार

---

47. O ∗ P म्हणजे O हा P पेक्षा मोठा किंवा समान
O @ P म्हणजे O हा P पेक्षा लहान किंवा समान
O % P म्हणजे O व P समान
O $ P म्हणजे O हा P पेक्षा लहान आहे
O ϕ P म्हणजे O हा P पेक्षा मोठा आहे
विधान - K ϕ L, L ∗ X, X $ Y
अनुमान - अ) K ϕ X   ब) Y ϕ L
1) अनुमान अ, ब बरोबर   2) अनुमान ब बरोबर   3) अनुमान अ बरोबर   4) अनुमान अ, ब चुक

---

48. काजल व कोमल एकाच जागी उभ्या आहेत. काजल उगवतीच्या दिशेने 12 मी. चालली तर कोमल मावळतीच्या दिशेने 9 मी. चालली नंतर काजल उजवीकडे वळून 15 मी. चालली तर कोमल डावीकडे वळून 15 मी. चालली पुन्हा काजल मावळतीच्या दिशेने 15 मी. चालती व कोमल उगवतीच्या दिशेने 12 मी. चालली. तर आता कोमल व काजल अंतर किती आणि कोमल ही काजलच्या कोणत्या दिशेला आहे ?
1) 6 मी. अंतर व पूर्वेला   2) 6 मी. अंतर व पश्चिमेला   3) 8 मी. अंतर व पूर्वेला   4)10 मी. अंतर व पश्चिमेला

---

49. नऊ वर्ण A, B, C, D, E, F, G, H व I यांना 1 ते 9 असे क्रमांक दिले मात्र याच क्रमाने दिलेले असतील असे नव्हे E ला 4 हा क्रमांक दिला. E व I च्या क्रमांकात 5 चा फरक आहे. D व I च्या क्रमांकात 3 चा फरक आहे. A चा क्रमांक D पेक्षा 2 ने जास्त आहे. तर A चा क्रमांक किती ?
1) 9   2) 8   3) 6   4) 7

---

50. पुढील अक्षर मनोऱ्यावर आधारीत अक्षरगटांचा क्रम समजून घ्या व प्रश्नचिन्हाचे उत्तर द्या.

E
F G
H I J
K L M N
O P Q R S
T U V W X Y

प्रश्न : TOKPU : YSNRX : EFHLI : ?
1) EGJNR   2) EGJMQ   3) EFIMJ   4) EGJMI

---


51. सुचना : खालील माहिती वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोधा
P, Q, R, S, T, U, V व W हे आठ कार एका वर्तुळाकृती मैदानाभोवती पार्किंगला लावण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक कारमधील अंतर सारखेच आहे. त्या कार्स वरील क्रमानेच पार्किंग केलेल्या असतील असे नाही W कार R च्या त्वरित डावीकडे पार्क केलेली आहे. T च R च्या दरम्यान फक्त एकच कार पार्क केलेली आहे. P कार T च्या उजवीकडे तिरऱ्या स्थानी आहे. P व U मध्ये फक्त तीन कार्स पार्क केलेल्या आहेत. S कार U च्या डावीकडे दुसऱ्या स्थानी पार्क केलेली आहे. V कार P च्या शेजारी पार्क केलेली नाही
प्रश्न : खालील चारपैकी तीन पर्यायातील कार्समध्ये एक विशिष्ट प्रकारचे साम्य आहे कोणता पर्याय या साम्य असणाऱ्या समूहात बसत नाही ?
1) WP   2) UW   3) QS   4) VT

---

52. A ला एकटयाने एक काम करण्यास 8 दिवस लागतात. B ला तेच काम करण्यास 12 दिवस लागतात. जर A, B आणि C तिघे मिळून ते काम 4 दिवसात करतात आणि त्याबदल्यात त्यांना 4500 रूपये मिळतील तर त्यात C चा वाटा काय असेल.

1) 500 2) 800 3) 750 4) 850

53. खालील आकृतींना लक्षात घेऊन त्या-त्या खालील दिलेल्या गोष्टीमधील संबंध अचूकपणे दर्शविणारी आकृती निवडा
प्रश्न : पर्वत, जंगले, पृथ्वी



1) 2) 3) 4)


54. प्रशांत तीन वर्षे मुदतीने रू. 1,00,000 चक्रवाढ व्याजाने घेऊन एका कंपनीचे समभाग विकत घेतले. व्याजदर द.सा.स.शे. 10% इतका होत तीन वर्षानी समभाग विकून कर्ज परत करून त्याला 16,900 रूपये फायदा झाला असता ?

1) एकूण भांडवलाच्या 13% 2) एकूण भांडवलाच्या 20%
3) एकूण भांडवलाच्या 50% 4) एकूण भांडवलाच्या 41%

55. एकावर एक ठेवलेल्या पुस्तकाच्या दहा पुस्तकांच्या संचामध्ये 3 इतिहासाची, 3 हिंदीची, 2 गणिताची आणि 2 इंग्रजीची पुस्तके आहेत. वरून सुरूवात केल्यास तिथे इंग्रजीचे पुस्तक इतिहास आणि गणिताच्या पुस्तकांमध्ये आहेत, इतिहासाचे पुस्तक गणित आणि इंग्रजीच्या पुस्तकामध्ये आहेत, हिंदीचे पुस्तक इंग्रजी आणि गणित या पुस्तकांमध्ये आहे गणिताचे पुस्तक दोन हिंदीच्या पुस्तकांमध्ये आणि दोन हिंदी पुस्तके गणित आणि इतिहासाच्या पुस्तकांमध्ये आहेत, तर वरून पाचव्या क्रमांकावर कोणते पुस्तक आहे ?

1) इंग्रजी 2) गणित 3) हिंदी 4) इतिहास

56. खालील आकृतीत किती ठोकळे आहेत ?



1) 28 2) 36 3) 40 4) 42


57. खालील विधाने वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधा
अ, ब, क, ड आणि इ ही पाच शहरे एकमेकांना वाहतुकीच्या विविध साधनांनी खालीलप्रमाणे जोडलेली आहेत
'अ' आणि 'ब' बोट आणि रेल्वेने जोडलेली आहेत
'ड' आणि 'क' बस आणि बोटीने जोडलेली आहेत
'ब' आणि 'इ' फक्त विमानाने जोडलेली आहेत
'अ' आणि 'क' फक्त बोटीने जोडली आहेत
'इ' आणि 'क' रेल्वे आणि बसने जोडली आहेत
प्रश्न : 'क' पासून सुरूवात करून 'ब' पर्यंत जाण्यासाठी पण वाहतुकीच्या साधनात बदल न करता कोणते साधन प्रकार उपलब्ध आहे?

1) विमान 2) बस 3) रेल्वे 4) बोट

58. ∗ $ △ म्हणजे ∗ ही △ ची आई
∗ # △ म्हणते ∗ हे △ चे वडील
∗ @ △ म्हणजे ∗ हे △ चे पति
∗ % △ म्हणजे ∗ ही △ ची मुलगी
तर A @ B $ C # D यामध्ये A व D यांच्यातील नाते कोणते ?

1) आजोबा (आईवडील) 2) आईकडून आजी 3) आजोबा (वडिलांकूडन) 4) वडिलांकडून आजी

59. खालील दिलेल्या आकृत्यांच्या गटात कोणती आकृती गटात बसत नाही



60. अतुलच्या घडयाळामध्ये दोष निर्माण झाला. त्याच्या घडयाळामध्ये 4 वाजून दहा मिनिटांची वेळ दिसत होती तेव्हा घडयाळाच्या आरशातील प्रतिमेएवढी वेळ ही खरी वेळ होती. तर अतुलचे घडयाळ किती मागे पडले आहे किंवा पुढे आहे ?

1) 3 तास 20 मिनिंटे पुढे
2) 4 तास 40 मिनिटे पुढे
3) 4 तास 20 मिनिंटे मागे
4) 3 तास 40 मिनिटे मागे

---

61. पुढील तक्त्यामध्ये अक्षरांचे चिन्ह सकेत दिले आहेत. त्यानुसार प्रश्नांची उत्तरे द्या मात्र पुढील अटी त्यामध्ये पाळा

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| E | K | D | M | C | T | V | U | X | R | B |
| I | 4 | 7 | 1 | 2 | 8 | 5 | A | 3 | $ | # |

अट

1) पहिले अक्षर स्वर आल्यास त्यापुढील अक्षरासाठीही त्या स्वराचा संकेत वापरावा
2) पहिले व शेवटचे अक्षर स्वर आल्यास मधील अक्षरासाठी △ चिन्ह वापरावे
3) पहिले व शेवटचे अक्षर व्यंजन आल्यास त्यांचे चिन्हे परस्परांमध्ये बदलावे
4) पहिले अक्षर व्यंजन मात्र शेवटचे अक्षर स्वर असल्यास स्वराऐवजी त्या व्यंजनाचे चिन्हे वापरावे

प्रशन : MRBU या शब्दासाठी योग्य चिन्हसंकेत ओळखा

1) 1$#A
2) 1#$A
3) 1$#1
4) 1#$1

---


62. मोहन, जितेंद्र, कौस्तुब, दिनेश आणि विजय हे पाच पुरूष आणि प्राजक्ता, रियांका, रंजना, सविता, तेजश्री आणि उज्वला चा सहा स्त्रिया आहेत. मोहन, जितेंद्र आणि रंजना हे वकील आहेत, कौस्तुब, दिनेश, प्राजक्ता, रियांका, आणि सविता हे डॉक्टर आहेत आणि उरलेले शिक्षक आहेत. खालील अटीची पूर्तता या अकरा जणांमधून काही संघ निवडायचे आहेत. मोहन, प्राजक्ता, उज्वला हे एकत्र असले पाहिजेत जितेंद्र हा दिनेश किंवा रंजना सोबत असणार नाही. विजय आणि रियांका एकत्र असले पाहिजेत. कौस्तुब आणि तेजश्री एकत्र असले पाहिजेत दिनेश आणि प्राजक्ता एकत्र असणार नाहीत. कौत्सुब हा रियांका सोबत असणार नाही

प्रश्न जर संघात एक वकिल, तीन, डॉक्टर, एक पुरूष शिक्षक असेत तर संघाचे सदस्य कोणते असतील

1) कौस्तुब, दिनेश, रंजना, सविता, तेजश्री
2) मोहन, दिनेश, प्राजक्ता, सविता, उज्वला
3) दिनेश, विजय, रियांका, रंजना, सविता
4) दिनेश, विजय, रियांका, रंजना, तेजश्री

---

63. खाली दिलेल्या कागदाची सांगितल्याप्रमाणे घडी घालून त्याला विशिष्ट आकाराचे छिद्र केले असता ती घडी उघडल्यानंतर कोणत्या प्रकारची प्रतिमा निर्माण होईल ते ओळखा




---

64. खालील विधाने लक्षात घेऊन त्यावरील प्रश्नाचे योग्य पर्याय निवडा ?

अ) ऑगस्ट महिन्यात पाच बुधवार आहेत
ब) या वर्षी ऑगस्ट महिना मंगळवारी सुरू झाला
क) ऑगस्ट महिन्यामध्ये चार रविवार आहेत
ड) काल 23 ऑगस्ट होता

'उद्या शुक्रवार आहे' हे कोणत्य विधानांवरून सिध्द होईल ?

1) अ व क
2) ब व क
3) ब व ड
4) अ व ब

---

65. मयुरीने प्रश्नपत्रिकेतील 18 प्रश्न सोडवले बरोबर उत्तराबद्दल प्रत्येकी 5 गुण मिळून व चुकीच्या उत्तराबद्दल प्रत्येकी 1 गुण कापला जाऊन तिला एकूण 78 गुण मिळाले, तिने, किती प्रश्न बरोबर सोडवले ?

1) 10
2) 12
3) 14
4) 16

---

66. गीताने 100 पेन 10% सवलतीच्या दरामध्ये खरेदी केले. या खरेदीसाठी तिला एकूण 600 रूपये खर्च करावे लागले. या पेनांच्या विक्रिसाठी तिला मूळ किंमतीच्या 15% इतका खर्च आला व्यवहारामध्ये एकूण 25% नफा होण्यासाठी 100 पेनांची विक्री किंमत गीताने काय ठेवावी ?

1) रु. 802.50
2) रु. 817.75
3) रु. 862.50
4) रु. 875.25

---

67. 1 9 6 5 I N D O P A K आरशातील प्रतिमा ओळखा ?

अ) 
ब) 
क) 
ड) 

68. विधाने : i) सर्व पिशव्या उश्या आहेत ii) काही पिशव्या कंपास आहेत

अनुमान : अ) काही उश्या पिशव्या आहेत

ब) काही उश्या कंपास आहेत

क) काही पिशव्या कंपास नाहीत

1) अनुमान अ, क चूक व ब बरोबर 2) अनुमान अ, ब, क बरोबर

3) अनुमान अ चूक ब, क बरोबर 4) एकही अनुमान बरोबर नाही

---

69. एका दुकानामध्ये M, B, J, O अशा वेगवेगळया उंचीच्या 4 बाहूल्या आहेत. O ही बाहुली M एवढी उंच नाही व B एवढी ठेंगू नाही. B ही O पेक्षा ठेंगू आहे पण J पेक्षा उंच आहे. जर अनूला सगळयात उंच बाहुली घ्यायची असेल तर तिने कोणती बाहुली खरेदी करावी ?

1) फक्त M 2) फक्त O 3) B किंवा O 4) यांपैकी नाही

---

70. दिलेल्या प्रश्नचिन्हांच्या जागी योग्य पर्याय निवडा

| | | |
|---|---|---|
| | 15 | |
| 2 | 80 | 6 |
| | 5 | |

| | | |
|---|---|---|
| | 9 | |
| 7 | 65 | 6 |
| | 4 | |

| | | |
|---|---|---|
| | 13 | |
| 16 | ? | 8 |
| | 11 | |

1) 48 2) 90 3) 75 4) 68

---

71. एक टाकी भरण्यासाठी A नळ सुरु केल्यास 5 तास तर B नळ सुरू केल्यास 10 तास लागतात. ती टाकी रिकामी करण्यात C नळ सुरू करून 3 तास वाट पहावी लागते. जर A, B व C तिन्ही नळ एकाच वेळी सुरू केले तर टाकी 30 तासांनी रिकामी होते. तर त्या टाकीमध्ये किती पाणी मावले ?

1) 90 लीटर 2) 100 लीटर 3) 120 लीटर 4) 150 लीटर


---

72. एका सांकेतिक भाषेत 'dom pul ta' म्हणजे 'bring hot food', 'pul tir sop' म्हणजे 'food is good', and 'tak da sop' means 'good bright bay', तर त्या भाषेत 'hot' कसे लिहिले जाईल ?

1) dom 2) put 3) ta 4) ठरवता येत नाही

---

73. प्रश्नचिन्हा ऐवजी ठेवण्यासाठी योग्य पर्यायातून निवडा




---

74. 13, 39, 15, 45, 17, 51, 19 ?

1) 53 2) 55 3) 57 4) 59

---

75. खालील दिलेल्या माहितीच्या आधारे प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.

एक शब्द व्यवस्थापन यंत्र जेव्हा शब्दांची एक ओळ इनपुट म्हणून दिली जाते, त्यावेळी ते यंत्र त्या ओळीला एका विशिष्ट नियमानुसार व्यवस्थित संयोजित करते. खाली इनपुट म्हणून दिलेली माहिती व संयोजनाच्या स्टेप दिलेल्या आहेत

Input : the government will favour higher average tariff
Step I : average government will favour higher the tariff
Step II: average favour will government higher the tariff
Step III : average favour government will higher the tariff
Step IV : average favour government higher will the tariff
Step V : average favour government higher tariff the will

प्रश्न : वरील नियमांप्रमाणे खालील Input चे Step IV कोणती असेल ?

Inpur : Samsung proposal to hike stake in the Indian venture
1) hike proposal to Samsung stake in the Indian venture
2) hike in Indian proposal stake Samsung the to venture
3) hike in Indian Samsung stake proposal the to venture
4) hike in to Samsung stake proposal the Indian venture

---

76. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेचा निधी उभारण्यासाठी इतर योजनांवरील खर्च कमी करण्यात आला आहे. तुमच्या तालुक्यातील हस्तकला कारागिरांची व स्थानिक वैशिष्टयांची उत्पादने विकण्यासाठी तुम्ही शासकीय निधीतून विक्री केंद्र उभारण्यास सुरूवात केली आहे. नवीन निर्णयामुळे हे केंद्र उभारण्यामध्ये अडचण निर्माण झाली आहे. या विक्री केंद्र योजनेचे तुम्ही नोडल अधिकारी असून उभारणी पूर्ण न झाल्यास आतापर्यंत खर्च झालेला निधी वाया जाण्याची शक्यता आहे. तुम्ही

1) विक्री केंद्राच्या उभारणीचे काम पुढील आर्थिक वर्षात निधी येईपर्यंत स्थगित कराल व त्याप्रमाणे संबंधित निविदा धारकांना स्पष्टीकरणासहीत कळवाल

2) विक्री केंद्रास पुरवठा करण्यासाठी जास्त प्रमाणात उत्पादन करण्याच्या हेतूने कारगिरांनी जास्त गुंतवणूक केली आहे. त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी त्यांचा उत्पादीत माल शासकीय निधीतून खरेदी करण्याचा प्रस्ताव त्यांना द्याल

3) विक्री केंद्रास उभारणीसाठीचा निधी कमी करण्यात येऊ नये यासाठी शासनाकडे मागणी करावी हे कारागिरांना सुचवाल व त्यासाठी त्यांना अर्ज करणे इत्यादी बाबीमध्ये मार्गदर्शन कराल

4) विक्री केंद्राची उभारणी पूर्ण करण्यासाठी उडठ (Corporate Social Responsibility) माध्यमातून निधी उभारण्याची परवानगी शासनाकडे मागाल

---

77. तुम्ही वित्त व लेखाधिकारी म्हणून नव्यानेच एका ठिकाणी रूजू झाला आहात या कार्यालयात तुम्ही पूर्वी कार्यरत असलेल्या कार्यालयाप्रमाणेच बेशीस्तपणा असून तुम्ही त्यास शिस्त लावण्यासाठी एक नियमावली तयार केली आहे. त्यामध्ये अन्य नियमांबरोबरच सर्वांना एकाच प्रकारचा पोशाख घालून येण्यासंबंधीचा निर्णय आहे. बैठकीमध्ये एक कर्मचारी वगळता सर्वांनी हात करून त्या नियमासह सर्व नियमांना संमती दिली आहे. यावरून कर्मचाऱ्यांच्या प्रतिसादाबद्दल कोणता निष्कर्ष काढाल ?

1) या कार्यालयातील कर्मचारी कार्यालयीन शिस्तीबाबत जागरूक असून तिचे पालन करतात

2) कर्मचाऱ्यांना स्वत:शिस्त लावून घेण्याची इच्छा आहे

3) कर्मचारी स्वत:वर बंधन घालून घेऊ इच्छितात

4) तुम्ही तयार केलेल्या नियमावलीस बहुतांशी कर्मचाऱ्यांचा पाठीबा आहे

---

78. कार्यालयीन वरीष्ठ पदावर कार्यरत महिला अधिकारी म्हणून तुमच्याकडे एक महिला कर्मचारी तिच्याशी होणाऱ्या गैरवर्तवणूकीबाबत मन मोकळे करते. एक पुरूष सहकारी त्याच्या वरीष्ठतेचा फायदा घेऊन तिच्याशी गैरवर्तन करीत आहे. पण लेखी तक्रार केल्यास आपल्याला कार्यालयामध्ये बदनामी सहन करावी लागेल तसेच तो अधिकारी आपल्याला नोकरी सोडून जावी लागावी असे वातावरण निर्माण करेल अशी भिती तिला वाटत आहे त्यामागे कार्यालयात याआधी राजीनामा देणाऱ्या महिलेचा संदर्भ आहे. याबाबत तुम्ही

1) महिलांच्या प्रतिष्ठेबाबत, सन्मानाबाबत कार्यालयामध्ये सकारात्मक वातावरणनिर्मिती करण्यासाठी भित्तीपत्रके, व्याख्याने, विविध स्पर्धा, इत्यादी उपक्रमांचे आयोजन कराल

2) संबंधित सहकाऱ्याला कायदेशीर कारवाई करण्याबाबत इशारा देऊन वर्तन सुधारण्यास सांगाल

3) इतर कोणत्या महिला सहकाऱ्यांना असा अनुभव आला आहे का हे तपासून त्यांना एकत्रिपणे याबाबत कायदेशीर कारवाई करण्यास शक्यतो सर्व मदत व मार्गदर्शन कराल

4) महिला सहकाऱ्याने लेखी तक्रार करावी असा सल्ला द्याल आणि यामळे नोकरी जाण्याची वेळ आलीच तर इतरत्र तिच्यासाठी नोकरी शोधण्याचे आश्वासन द्याल

---

79. तुम्ही सरपंच आहात राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय ग्रामविकास योजना प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतीची एक महापरिषद आयोजित करण्यात आली असून केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री त्या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या परिषदेत तुम्हास सरपंच या नात्याने राष्ट्रीय ग्रामविकास योजनेतील तुमच्या ग्रामपंचायतीच्या कार्याचे उल्लेखनीय यश आकडेवारीसह सर्वांसमोर सादर करावयाचे आहे. त्या अनुषंगाने सादरीकरणात अडथळे आणू शकतील अशा प्रतिकुल स्वरुपाचे आहेत. अशावेळी तुम्ही काय कराल ?

1) प्रतिकुल आकडेवारी सर्वप्रथम सांगून त्या पार्श्वभूमीवर उल्लेखनीय आकडेवारी सादर कराल

2) उल्लेखनीय आकडेवारीच्या तुलनेत प्रतिकुल आकडेवारीचे प्रमाण कितीतरी कमी आहे यावर जोर देऊन बोलाल

3) उल्लेखनीय आकडेवारीस तुमचे प्रयत्न कारणीभूत असून प्रतिकुल आकडेवारीस राज्यातील मंत्री जबाबदार असल्याचे ठासून सांगाल

4) केवळ उल्लेखनीय आकडेवारीच्या मदतीने तुमच्या ग्रामपंचायतीचे यश सर्वांसमोर मांडाल

---

80. तुम्ही जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत असलेल्या जिल्ह्यात सारखेचा तूटवडा निर्माण झाला आहे. ज्यामुळे विवाह समारंभासाठी जास्तीत जास्त 30 किलो इतकीच साखर देण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. आपल्या एक जवळच्या मित्राच्या मुलाचा विवाह होणार असून तुमचा मित्र आपल्या मुलाच्या विवाहासाठी कमीत - कमी 50 किलो साखर देण्याची गळ घालत आहे. त्यास या संदर्भातील सरकारी नियंत्रण बाबत कल्पना दिली असता तो तुमच्यावर नाराज होतो. जिल्हा न्यायाधीश असल्यामुळे तुम्ही तुमच्या मर्जीनुसार कितीही प्रमाणात साखर देऊ शकता याची त्यास खात्री आहे. तुम्ही त्याच्या सोबतची मैत्री बिघडवू इच्छित नाहीत. अशा परिस्थितीमध्ये तुम्ही काय कराल ?

1) मित्राच्या मागणीनुसार जादा प्रमाणात साखर प्रदान कराल

2) आपल्या मित्रास जादा प्रमाणात साखर पुरवठा न करता नियमांचे कसोशीने पालन कराल

3) आपल्या मित्रास शासकीय आदेशाच्या प्रती दाखवून त्यास नियमाप्रमाणे साखर घेण्यास तयार कराल

4) त्यास वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यास प्रत्यक्ष विनंती करण्याचा सल्ला घ्याल आणि प्रकरणात तुम्ही हस्तक्षेप करीत नसल्याचे सूचित कराल